प्र. सु. हिरुरकर

अशी पाखरे...

या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!

अशी पाखरे...

हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख. आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो. मजा येते.

पण तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या. लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या. मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

अशी पाखरे...

लेखक

प्र. सु. हिरुरकर

अशी पाखरे...

लेखक... प्र.सु.हिरुरकर

‘ रानभूल ’ , जवाहर नगर, लेन नं. 4,
नवसारी बस स्टॉप जवळ, पो. वि.म.वि., अमरावती – 444 604
भ्रमणध्वनी – 9822639798 / 8329764007
ranbhul@gmail.com

मुखपृष्ठ व सर्व छायाचित्रे –प्र.सु.हिरुरकर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

Whatsapp- 9987737237
www.esahity.com
esahity@gmail.com

eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604
प्रकाशन : १२ एप्रिल २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

अशी पाखरे...

लेखक – प्र.सु.हिरुरकर,

नांव : **प्रदीप सुखदेवराव हिरुरकर**,

जन्मतारीख: 17 मार्च , 1962

पत्ता :'रानभूल' , लेन क्र.4,जवाहर नगर, अमरावती-444 604

दूरध्वनी : 2531102 भ्र.ध्व. 9822639798.

नोकरी : सेवानिवृत्त स्वीय सहाय्यक, विभागीय माहिती कार्यालय, अमरावती. दूरध्वनी : 2551499

छंद : वन्यजीव लेखक, जवळपास 30 वर्षापासून अरण्य भटकंती करुन वन्यजीवांचे निरीक्षण व त्यावर आधारित अरण्य लेख दै.महाराष्ट्र टाईम्स, दै.लोकसत्ता, साप्ता.लोकप्रभा, दै.लोकमत, दै.तरुणभारत, दै.हिंदुस्थान,दै.सकाळ, दै.जनमाध्यम इ.वृत्तपत्रात प्रकाशित होत असतात.

प्रकाशित पुस्तके : *वन, वन्यजीवन आणि पर्यावरणावर आधारित*

1. **अरण्य ओढ** (जून, 2005 मध्ये प्रकाशित.)
2. **भुलनवेल** (22 सप्टेंबर, 2007 रोजी प्रकाशित.)
3. **पक्षिमेळा** (5जून,2009 पर्यावरणदिनी प्रकाशित.)
4. **बांधवगडचा शिकारी**
5. **रानवेड**
6. **पडाव** : रानावनातील ब्रिटीशकालीन विश्रामगृहे
7. **A Legacy of British** :Rest Houses in Forests
8. **अरण्यलिपी**

व्हिडीओ लघुपट :

1. **टिटवी** (मराठी), Red wattled lapwing(English)
2. **Natures Blessing**
3. **पोपटाचं एक गांव**

संशोधन कार्य : सातपुडा पर्वतराजीत ताप्तीच्या खोऱ्यात अश्मयुगीन चित्रगुहांचा (15 ते 20 हजार वर्षापूर्वीच्या) Hopeच्या चमूसोबत शोध. जानेवारी, 2007मध्ये प्रथम शोध.आतापर्यंत अशा ३० चित्रगुहांचा शोध.रॉक आर्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या पुराकला -2007 च्या जरनलमध्ये शोध प्रबंध प्रसिध्द. केरळमधील सुलतान बथेरी येथे 2007मध्ये, भोपाळ येथे रॉक आर्ट सोसायटी ऑफ इंडियातर्फे ,बदामी (कर्नाटक) येथे आयोजित आंतर राष्ट्रीय परिषदेस उपस्थित. (RASI , ASI), "भुलनवेल" या रहस्यमय वेलीचा मेळघाटात 2009 मध्ये शोध.

पुरस्कार : 1993-94 चा राज्य शासनाच्या विकास वार्ता पुरस्कार

जुलै, 2006 मध्ये मा.मुख्यमंत्री यांचे हस्ते विशेष कामगिरीबाबत गौरव,प्रशस्ती पत्र व सत्कार.

कार्य : वन, वन्यजीवन आणि पर्यावरण या विषयांवर शाळा, महाविद्यालयांमध्ये व्याख्यान.पर्यावरण रक्षणासाठी काम करणाऱ्या संस्थांना मार्गदर्शन. जगप्रसिध्द चित्रगुहा असलेल्या भिमबेटका(मध्य प्रदेश) येथे ऑक्टोंबर 2008मध्ये भेट.(चमूसह)

भ्रमंती : सायलेंन्ट व्हॅली, कान्हा, बांधवगड, पेंच, मेळघाट, पैनगंगा अभयारण्य, वायनाड अभयारण्य (केरळ)

अर्पण पत्र

पक्षी हे निसर्गाला पडलेलं सुंदर स्वप्न आहे.

त्यांची रंगसंगती, आकार आणि त्यांचे जीवन चक्र अनुभवतांना हे पटते.

चराचरातील प्रत्येक सजीव हा निसर्गाचे, पर्यावरणाच्या समतोलात अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडतात.

माणूस मात्र ते बिघडवण्याचे काम करतो.

अशा सुंदर पाखरांवर प्रेम करणाऱ्या सर्व पक्षी निरीक्षक, अभ्यासक आणि पक्षी प्रेमींना सादर अर्पण.

- प्र.सु.हिरुरकर

लेखकाचे मनोगत

‘**अशी पाखरे...**’ हे माझे तीन तपाच्या अरण्य भटकंतीतील निरीक्षणावर प्रकाशित होणारे दहावे पुस्तक असून दुसरे ई बुक आहे.. आधूनिक आणि गतीमान जगाबरोबर आपणही बदलले पाहिजे आणि जगभरातील वाचकांना ते वाचायला मिळाले पाहिजे यासाठी हा प्रयत्न. वन, वन्यजीवन, पशुपक्षी यावर आधारित माझी अरण्यओढ, पक्षिमेळा, भुलनवेल, बांधवगडचा शिकारी, रानवेड, पडाव : रानावनातील ब्रिटीशकालीन विश्रामगृहे, पडावचे मराठी भाषांतर A Legacy of the British : Rest Houses in Forest, आणि अरण्यलिपी, अरण्यगूज अशी नउ पुस्तके यापूर्वी प्रकाशित झाली आहेत. मी हा रानावनात भटकून त्यावर लिहीण्याचा जो छंद जोपासला आह तो निसर्गाचा एक इवलासा विद्यार्थी म्हणूनच. तो मी अखेरच्या श्वासापर्यंत जोपासणार आहे.

‘**अशी पाखरे...**’ या पुस्तकात एकूण 14 प्रकरणे असून ती सर्व दै. महाराष्ट्र टाइम्स, दै. लोकसत्ता, दै. तरुण भारत इ. वृत्तपत्रात वेळोवेळी प्रसिध्द झाली आहेत. अरण्य भटकंती सोबत माझा वन्यजीव छायाचित्रणाचा छंदही आता हळूहळू वाढू लागला आहे. अशी पाखरे . . .’ पुस्तकातील सर्व छायाचित्रे ही माझ्या कॅमेरातून क्लीक झालेली आहेत.

अशी पाखरे...’ हे पुस्तक ठाणे येथील ई साहित्य प्रतिष्ठानचे श्री सुनीळ सामंत हे प्रकाशित करत आहेत. आधुनिक गतिमान काळात ईबुक अख्या जगभर जवळच्या मोबाईलवर डाऊनलोड करुन असंख्य वाचक वाचू शकतात. त्यासाठी हा प्रयत्न आहे. त्यांचा मी ऋणी आहे. या पुस्तकासाठी मला ज्या ज्ञात अज्ञात व्यक्तींचे, शक्तींचे सहकार्य मिळाले त्या सर्वांचा मी मनापासून आभारी आहे. .

- प्र.सु. हिरुरकर, अमरावती.

- अनुक्रमणिका -

1. क्रौंच्च पक्ष्याचं वादळ
2. मान्सूनसखा नवरंग
3. महासागराचा प्रवासी – सोनचिखल्या
4. मधूबाजचा टापू
5. माळरानाचा शिकारी सापमार गरुड
6. सारसाचं देणं
7. तो राजहंस एक
8. हिरवं तळं
9. वैशाखाचं देणं – निळ्या शेपटीचे पाणपोपट
10. नवथळचा शिकारी – उंदीरमार बाज
11. कलकल कलहंसे. . .
12. डूडा
13. सारंगागार
14. सजीव सृष्टी आणि पावसाचे पूर्वसंकेत

1 क्रौंच पक्ष्यांचं वादळ

यावर्षी वर्षा ऋतू नोव्हेंबर पर्यंत लांबल्याने हिवाळाही वेळाने सुरु झाला. त्यामुळे शिशिरातही बोचरी थंडी कायम होती. अशा वातावरणात एका भल्या पाखर पहाटे माझी पावलं शहरापासून दूर असलेल्या तळ्याकडे वळली. कारण होते परदेशी स्थलांतरीत पक्ष्यांचे निरिक्षण. कोवळ्या सूर्यकिरणात तळ्यावर पोहोचलो. वरती ढगछाया पसरली होती. वातावरणात गारवाही होता. इतर पाणपक्षी आपआपल्या अन्नशोध कार्यक्रमात मग्न झाली होती. तळे तसे शांत होते. परंतु पक्ष्यांची उपस्थितीही तुरळक होती. परंतु पाण्यातील एका लहानशा खडकाळ बेटावर ११ रंगीबेरंगी चित्रबलाक पक्षी शांतपणे आराम करत होती. लपत छपत त्यांना असुरक्षित वाटू नये म्हणून एका लहानशा बाभळीखाली आडोशाला बसलो. काही छायाचित्रही काढली. परंतु थोड्यावेळातच चित्रबलाकांची हालचाल वाढली आणि संपूर्ण थव्याने उड्डाण भरले. पांढऱ्या-गुलाबी रंगाच्या पक्ष्यांची ही माळ उंच उंच उडत दूरवर निघून गेली. मीही दुसऱ्या तळ्याकडे निघण्याचा निर्णय घेातला. तोच मित्राचे लक्ष बाभळीवर लटकलेल्या सापाच्या कातीकडे गेलं. ती होती विषारी नागाची कात. दोन-चार दिवसापूर्वी ती टाकली असावी.

हरभरा, गव्हाची हिरवीगार शेतं व त्यामधून जाणारा रस्ता दूरपर्यंत सोबतीला होता. एक प्रसन्नता व चैतन्य फुलविणारं ते वातावरण होतं. धामोरी तलावावर दुचाकीने जावून पोहातो तो येथे माणसांचा भरपूर वावर होता. त्यामुळे पक्ष्यांची उपस्थिती अजिबातच नव्हती. तेथून पावलं वळली ती कुमागडच्या तळ्याकडे.

काही वेळाने पाच-सहा किलोमिटरवरच्या तलावावर पोहोचलो. तलावाच्या भिंतीवर असलेल्या एका बाभळीखाली पोहचल्या बरोबर नभात एक वादळ डोक्यावर घोंगावू लागलं. या वादळाला कुर्र, क्रर्रsss कंठ फुटला होता. ते वादळ होतं शेकडो क्रोंच्च पक्ष्यांचं. त्यांनी हवेतूनच तळ्यावर एक चक्कर मारली आणि दूरवर निघून गेले. हे होते दक्षिण युरोप, उत्तर आणि उत्तर व मध्य आशियातून आलेले परदेशी स्थलांतरीत क्रौंच्च पक्षी. यालाच Demoiselle Crane असे म्हणतात.

एक दुर्मिळ संधी निघून गेली होती. परंतु निसर्ग भ्रमण करतांना अपेक्षा न ठेवता भटकंती करणे चांगले असते. एक संधी घ्यायची असते. मात्र कुमागडच्या या तळ्यावरइतर अनेक पक्ष्यांची उपस्थिती होती. यात राखी बदक तूतवार, पांढरा शराटी, अडई धोबी, टिटवी इ. पक्षी आपले अन्न मिळवण्यात गुंग झाले होते.

सूर्य डोक्यावरुन पश्चिमेकडे उतरु लागला होता. दूपार टळली होती. अजून एका तळ्यावर संधी घ्यावी म्हणून तिकडे निघालो. रस्त्यावर एक वृध्द शेतकरी आपल्या शेताचे रक्षण करत उभा होता. त्याला विचारले – आजोबा, आता जी पाखरं येवून गेली त्याला काय म्हणतात? तो म्हणाला- हे 'करका' पक्षी आहेत. हिवाळ्यात ते दरवर्षी येतात. गव्हाची कोवळी पाती, कोवळ्या ओंब्या तसेच हरभरा हे त्यांचं मुख्य खाद्य आहे. हा भूभाग तसा हरभरा पिकाकरिता अख्या विदर्भात प्रसिध्द आहे. त्यात लहान-मोठी तळीसुध्दा आहेत. हे करके रात्रभर शेतातील पिकांवर ताव मारतात. आणि दिवसा तळ्यावर मुक्काम करतात. सांज होण्यापूर्वी मी आता जास्त न थांबता पुढील तलावाकडे निघालो. जवळपास अर्धा तासाने एका गाव ओलांडून एका तलावाच्या भिंतीच्या पायथ्याशी गाडी ठेवली. कॅमेरा तयार केला आणि तलावाची भिंत चढू लागलो. तळ्यावर नजर फिरवली. अन् मी अवाक् झालो. मुखातून शब्द फुटेना. सुंदर शेकडो क्रौंच पक्षी शांतपणे बसले होते. या थव्यात सामान्य क्रौंच आणि डेमोसाइल क्रौंच होते. तळ्याला तीनही बाजूने बेशरम वनस्पतीने कवटाळल्यागत दिसत होते.

मी त्वरीत हळूवारपणे लपतछपत बेशरमच्या लपणात जावून बसलो. आभाळी वातावरणामुळे प्रकाश स्पष्ट नव्हता. तरीपण कसेबसे छायाचित्र घेण्याचे प्रयत्न करत होतो.

संपूर्ण तलाव क्रौंच पक्ष्यांच्या उपस्थितीने,त्यांच्या हालचालीने भारुन गेला होता. बसल्या बसल्या त्यातील काही पंख साफ करत होते, तर काही उघडझाप करत होते. मधेमधे कुर्र कूर्र... आवाजाने एकमेकाला सावध करत होते. बराच वेळ एकका दडून बसलो होतो. सांजसावल्या पसरु लागल्या. सूर्य मावळतीला पोहचू लागला होता. मीही आपली पावलं माणसांच्या गावाकडे वळवली ती येणाऱ्या रविवारी परत येण्याच्या उद्देशाने.

सूर्य डोक्यावर आला होता. आज उन्हेही थोडीफार रखरखीत वाटत होती. एक गुराखी आपली गुरं-ढोरं चारत होता. त्याला जवळ बोलावून विचारले. येथे करकोचे पक्षी येतात काय? तो म्हणाला – आता सकाळी तळ्यावरच होते. काही वेळापूर्वीच निघून गेले. आता ते सांजवेळी तळ्यावर एकदा येतात. आमच्या आशा पल्लवीत झाल्या. आज दिवसभर येथेच थांबायचा निर्णय आम्ही घेतला. मी परत गुराख्याला एक प्रश्न केला. येथे क्रौंच्च पक्ष्यांची शिकार होते काय? तो म्हणाला – नाही. येथे शिकार होत नाही. परंतु एकदा गावातील एका व्यक्तीने शिकार करण्याचा प्रयत्न केला असता शेकडो क्रौंच्च पक्षी त्यावर मधमाशासारखे तुटून पडू लागले परिस्थितीचे गांभिर्य लक्षात येताच तो माणूस सुसाट गावाकडे पळला व कसाबसा वाचला.

तेव्हापासून येथे कोणी शिकारीचा प्रयत्न करतांना दिसला नाही. हे दृश्य गुराख्याने स्वत: डोळ्याने पाहिल्याचे मला सांगितले. गुराखी परत आपल्या गुरांकडे निघून गेला. पोटात भूकेचे कावळे ओरडत होते. आम्हीही हलकासा नाश्ता-पाणी करुन शांत बसलो.

सूर्य पश्चिमेकडे कलू लागला होता. पाण्यावर आलेली गुरांची पावलं गावाकडे परतू लागली. गळ्यातील घंटयाचे नादमधूर आवाज येवू लागले होते. काही वेळातच वातावरण शांत शांत झालं. आम्ही सकाळपासून तळ्याच्या काठावरील बेशरममध्ये लपणात बैठक मांडली होती. बराच वेळ निघून गेला तोच माझ्या कानात हलकासा अस्पष्ट कुर्र,कुर्र ss क्रर्र आवाज ऐकू आला. थोड्या वेळातच तो कानात स्पष्ट येवू लागला आणि हलकासा वळून नभाकडे पोहातो तो मुखातून शब्द बाहेर पडले सर, क्रौंच ! निळ्या निळ्या नभातून हजारो क्रौंच पक्ष्यांचा थवा आम्ही ज्या तळ्यावर बसलो होतो त्याच दिशेने येत होता. आणि काही क्षणातच क्रौंच्चाचं वादळ डोक्यावरील नभात घोंगाउ लागलं. सांज कलू लागली. पाण्यावर आलेली गुरं गावाकडे परतली. तळं आता शांत शांत झालं. आम्ही तळ्याच्या काठावरील बेशरममध्ये लपणात बैठक मांडली. बराच वेळ निघून गेला तोच माझ्या कानात हलकासा कुर्र,कुर्र ss क्रर्र आवाज ऐकू आला.

एक, दोन, तीन वेळानंतर तो स्पष्ट येवू लागला आणि हलकासा वळून नभाकडे पोहातो तो मुखातून शब्द बाहेर पडले सर, क्रौंच ! आकाशातून हजारो क्रौंच पक्ष्यांचा थवा आम्ही ज्या तळ्यावर बसलो होतो त्याच दिशेने येत होता. आणि काही क्षणातच क्रौंच्चाचं वादळ डोक्यावरील नभात घोंगाउ लागलं.

आम्ही आडवं पडल्या पडल्याच हालचाल न करता हे वादळ तळ्यावर कधी उरते याची वाट पाहात होतो. परंतु ते वादळ न उतरताच आले त्या दिशेकडे परतलं. दूरवर निघून गेलं. आम्ही जैसे ते अवस्थेतच होतो. परत पुन्हा काही वेळाने ते वादळ घोंगावत आलं आणि परत फिरलं. पुन्हा काही वेळातच ते डोक्यावर घोंगावू लागलं. आम्ही श्वास रोखून धरला. परंतु त्यांना आमचा नक्कीच सुगावा लागला असावा. परत ते आले त्या दिशेकडे दूरवर निघून जावू लागले. दुर्बिन लावून पाहू लागलो तर क्रौच्चाचं एवढं मोठं वादळ एका लहानशा ठिपक्या नजरेआड झालं होतं. परत एक संधी गेली होती. परंतु जवळपास सहा-सातशे क्रौच्च पक्ष्याचा एवढा मोठा थवा आयुष्यात पहिल्यांदाच बघायला मिळाल्याचा आनंदही देवून गेला होता. सूर्य मावळतीला गेला आणि आम्हीही आपली पावलं आपल्या शहराकडे माघारी वळवली. जवळपास तीन तपापासूप पक्षी निरीक्षण हा माझा आवडता छंद. प्रत्येक हिवाळ्यात अमरावती जिल्हयातील तळ्यावर परदेशी स्थलांतरीत पक्ष्यांच्या निरीक्षणाकरिता भटकतो. केकतपूर, मालखेड,सूर्यगंगा, विर्शी येथे हे क्रौंच पक्षी दरवर्षी येतात.

परंतु ते ५०-६० च्या संख्येने असतात. यापूर्वी २०१३ साली अमरावती लगतच्या राजूरा तलावावर चारशे क्रौच्च पक्षी पाहायला मिळाले होते. त्यानंतर तब्बल १७ वर्षाने यावर्षी ते सहाशे-सातशेच्या आसपास एकत्र थव्याने आढळून आले. कदाचित यावर्षी पाऊस नोव्हेंबर पर्यंत अधूनमधून सुरु असल्याने हिवाळाही लांबला असल्याने या क्रौच्च पक्ष्यांना आगमनालाही एक महिना वेळा झाला असावा. त्यामुळे ते वेगवेगळ्या तळ्यावर विभागले नसावे. परंतु पक्षी अभ्यासकांच्या अंदाजानुसार यावर्षी हिवाळ्यास विलंब झाल्याने ते कदाचित येणार नाही , असा जो सूर होता. तो या पक्ष्यांच्या वादळारुपी उपस्थितीने खोटा ठरला. ते वेळाने आले पण एक वादळ बनून राहू लागले. ते वादळ होतं परदेशी स्थलांतरीत क्रौंच पक्ष्याचं! क्रौंच पक्षी आपल्या घट्ट व खरखरीत पंखानी आकाशात दूरवर जातात. मंद मंद नाद समूहाने राहणारे, रागात प्रचंड गतिमान आणि वैरिपक्षिना शद असतात. यांना मांसभक्षणाची चटक असून सतत झोपतात. पण माध्यान्ही ते जलक्रीडा करतात. जमिनीवरुन किंवा पाण्यावरुन सुरुवातीला उडणे त्यांना जरा जड जाते. पण एकदा का हवेवर ते आरुढ झाले म्हणजे पंखांच्या हळूवार दिसणाऱ्या पण अतिशय नियमबध्द हालचालीने मान पुढे व पाय मागे ताणून हे क्रौंच पक्षी अतिशय वेगाने प्रवास करतात. यांची प्रेमक्रीडा अतिशय सुंदर असते. पंख पुसून उड्या मारुन, एकमेकांना सलाम करुन, नाचत व खिदळत ते आपली प्रणयक्रीडा करीत असतात.

हंसदेव विरचित मृगपक्षिशास्त्र या ग्रंथात सुंदर अशा क्रौंच पक्ष्याचा उल्लेख पुढील प्रमाणे केला आहे.

मंदाच्च मंदनादाश्च स्वमूयसह चारिण

क्रौंच प्रचंडवेगाइच वैरिपक्षिविनाशिन:

इंटरनॅशनल क्रेन फाऊंडेशनचे संस्थापक डॉ. जार्ज आर्चीबाल्ड यांच्या संशोधनानुसार जगात क्रौंच पक्ष्यांच्या एकूण १५ जाती आहेत. त्यापैकी सारस क्रौंच हा सर्वात मोठा उडणारा पक्षी असून त्याची ऊंची ५.७ मीटर एवढी असते.

क्रौंच Demoiselle Crane पक्ष्याची उंची सुमारे एक मीटर असून एक नाजूक आकाराचा व करड्या रंगाचा आहे. याचे डोके व मान काळे असते. याच्या मानेवरच्या खालच्या बाजूची पिसे अरुंद, दोन्ही बाजूला कमी कमी होत जाणारी व छातीवरुन खाली लोंबणारी असतात. सहज दिसतील असे डोळ्यामागील कानावरचे सफेदरंगी पिसांचे पुंजके असून नर-मादी सारखेच दिसतात. भारतीय संघराज्यात हे हिवाळी पाहूणे असून कर्नाटकाच्या दक्षिणेपर्यंत दिसतात. हे पक्षी आकाशातून उडतांना 'V' आकारात उडतात. त्यावेळी त्यांची मान व पाय पूर्णपणे लांब पसरलेले असतात. यांचा आवाज मोठा तूतारीच्या सुरांसारखा कूर् – कूर् sss असा सुरावटीत असतो. दक्षिण युरोप, उत्तर आफ्रिका आणि उत्तर व मध्य आशिया येथून येतात. मे ते जून या काळात यांची वीण असते.

. . . . .

2 मान्सूनसखा ‘नवरंग’

नवरंग

ज्येष्टी पोर्णिमा पार पडली. नभामध्ये कृष्णमेघांची धावपळ सुरु झाली. वारा हातमिळवणी करु लागला. आभाळ भरुन आले. विजांचा कडकडाट सुरु झाला. भरदिवसा संधीछाया पसरली. आणि पाऊसधारा धरतीवर कोसळू लागल्या. एकप्रकारे विश्वजनांच्या अंगावर उमटलेली ही सुंदर गर्भछाया असते. हळूहळू दक्षिणेकडून मोसमी वारे केरळ,कर्नाटक, महाराष्ट्रातील कोकणपट्टीत प्रवेश करु लागतात. काही दिवसातच हा मान्सून राज्यभर पसरु लागतो. शेतकरी आपल्या शेतात पेरणीच्या कामास सुरुवात करतो तर पक्षीकुळं आपआपल्या घरट्यात अंड्यातून पिल्लं निघण्याची वाट पाहात असतात. तर काही पक्ष्यांची विणीच्या हंगामाची लगबग सुरु असते.

नुकतीच मान्सूनची पावलं आमच्या भागात पडू लागली आणि माझी पावलंही जंगलाकडे वळली. अमरावतीहून वडाळी मार्गे मी चांदूर रेल्वे रस्त्याने दुचाकीनी निघालो. वेळ जरी सकाळी ११ वाजताची असली तरी दिगंतरातील कृष्णमेघांची छाया येथील अरण्यभूमिवर पडली होती. बऱ्यापैकी वाराही सुटला होता. अगोदर पडलेल्या थोड्या पावसामुळे काळ्या भूमीवर हिरवे अंकुर फुटू लागले होते. ग्रिष्मात बोडख्या झालेल्या वृक्षांची वाळली पाने जमिनीवर एकमेकांवर अंग चोरुन बसली होती. मात्र आपल्या हिरव्या तजेलदार पानांनी सळसळणारा कडुनिंब आपल्या हजारो होतांनी मान्सूनच्या स्वागतास सज्ज झाला होता.

जवळपास पंधरा-वीस किलोमीटर अंतरावर पोहरा गावानंतर दोन ठिकाणी एका नाल्याजवळ थांबलो. या काळात दक्षिणेकडून येणाऱ्या 'नवरंग' पक्ष्याची माझी शोधमोहीम सुरु होती. बराच शोध घेवून पुढे निघालो. काही अंतरावर डावीकडे आणखी एक नाला दिसला. वड, पिंपळ, चिंच, अर्जून इ. मोठमोठ्या वृक्षवल्लरीतून हा नाला वाहातो. तो पुढे पोहरा तलावास मिळतो. नाल्यावरील घनदाट वृक्षलतांच्या या घळीत मी पायी उतरु लागलो. आधीच कृष्णमेघी छायेनी दाटलेला या परिसरात मोठमोठ्या झाडांमुळे अधिकच संधीछाया पसरली होती. नुकत्याच पडून गेलेल्या दोन-तिन पावसामुळे नाल्यात जागोजागी वाळलेल्या पानांचे पुंजके पडले होते. या खाली किडे-कीटकं आणि सरपटणाऱ्या सजीवांचं एक अनोखं विश्व संचारत असते. झाडांवरील विविध पक्षी त्यावर बारीक नजर ठेवून असतात. त्यामुळे धनेश, बुलबुल, कोतवाल, खंड्या, मैना, शिक्रा इ. पक्ष्यांचा येथे कलरव उठला होता. पाखरांच्या अनेक भराऱ्या येथे पाहावयास मिळत होत्या. माझे डोळे आणि कान मात्र 'नवरंग' पक्ष्याच्या शोधात भिरभिरत होते. त्याचा आवाजही ऐकू येत नव्हता. बराच वेळ निघून गेला.

शेवटी मी अखेरचा उपाय म्हणून माझ्या मोबाईलमधील नवरंगाच्या आवाजाची ऑडीवो ट्यून वाजवली. सुरुवातीस काही उपयोग झाला नाही. मात्र काही वेळातच दुरुन पुसटसा ट्यूवीट,ट्युवीट असा आवाज कानी पडू लागला. हळूहळू तो वाढू लागला. अर्थातच तो जवळजवळ येत होता. मी नाल्यात एका भव्य अशा पिंपळ

वृक्षाखाली एकाच ठिकाणी उभा होतो. थोड्या वेळातच तो माझ्या पुढ्यातील एका वृक्षावर येवून बसला आणि आवाज करु लागला. तेथून तो मी उभ्या असलेल्या पिंपळ वृक्षाच्या डोक्यावरच्या फांदीवर येवून बसला. परत ट्वीईट्ट ट्वीईट्ट असा आवाज काढू लागला. पिंपळ हिरव्या-कोवळ्या पानांनी लदबदला असल्याने मी त्याला पानापानात एकसारखी मान वर करुन शोधू लागलो होतो. संधीप्रकाशामुळे नजरेला बरीच धडपड करावी लागत होती. शेवटी तो वरुन खाली, खाली फांदीवर आवाज करत करत उतरु लागला आणि डावीकडील एका झाडावर चढणाऱ्या एका वाळलेल्या वेलीवर येवून बसला. आता मला त्याचे दर्शनही झाले होते. आहाहा... काय या नवरंगाच्या विविध रंगाची आणि आवाजाची लिला वर्णावी!

आकाराने ब्राम्हणी मैनेएवढा. आखूड शेपटीचा. रंगाने हिरवा, निळा, पिवळसर, तपकिरी, काळा, पांढरा आणि लाल या सप्तरंगाची जादुई उधळण निसर्गाने या पक्ष्यावर केली आहे. तो मान वर करुन चोच नभाच्या दिशेने नेउन ट्वीईट्ट ट्वीईट्ट, ट्वीईट्ट ट्वीईट्ट असा आवाज काढत होता. जणूकाही तो आकाशातील ढगांना पावसाकरिता आळवणी घालत असल्यासारखे वाटत होते. पण प्रत्यक्षात मात्र नवरंग आपल्या साथीदाराच्या प्रतिसादासाठी आणि आपल्या अधिवासाची जाणीव देण्यासाठी काढत असतो.

अपूरा प्रकाश असूनही मी मात्र त्याला जवळच्या कॅमेरात टिपण्यासाठी मग्न झालो होतो. तो वेळावेळाने विविध वृक्षलतांवर जाऊन आवाज काढतच होता. काही वेळाने मी नाल्यातून वर चढू लागलो तसतसा तोही सुरक्षीत अंत ठेवून झाडाझाडांवरुन अुडत होता. त्याने एक थोडी दूरवर उड्डाण भरली तसा मीही थोडा झपाझप पावलं मुख्य रस्त्याकडे जात त्याचा पाठलाग करत होतो. पुढे जावून पाहातो तर नवरंग एका वाळलेल्या सागवृक्षावर येवून बसला होता. मीही सुरक्षीत अंतर ठेवून तेथे पोहोचलो. आकाशातील ढगं काही फाटू लागल्याने येथे सूर्यप्रकाशा नसला तरी किंचितसा प्रकाश पडला होता. त्यामुळे काहीसे चांगले छायाचित्र व व्हिडिओ मिळाले. एवढ्यात त्याने चारवेळा परत ट्वीईट, ट्वीईट आवाज काढला आणि दूरवर रानाकडे भरारी घेतली. बऱ्याच वर्षाच्या प्रतिक्षेनंतर आज या मान्सूनसखा नवरंगाचे दर्शन झाले होते. मन प्रसन्न झाले. चैतन्य संचारले.

'नवरंग' हा पक्षी दक्षिण-पश्चिमेकडून मान्सूनसोबत अख्या महाराष्ट्रभर पसरतो. नर-मादी दिसायला सारखेच असतात. हे पक्षी एकेकटे खुरट्या जंगलातील माजलेल्या रानात आढळतात. भारतातील चांगले जंगल असलेल्या भागात तसेच साधारणपणे १२०० मीटर उंचीपासूनच्या हिमालयीन

प्रदेशात व खाली दक्षिणेकडे पाकीस्थान, श्रीलंका, बांगला देश येथे आढळतो. स्थानिक पातळीवर या

पक्ष्याचे स्थलांतर नैऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे पडणाऱ्या पावसामुळे होत असावे. मे ते ऑगष्ट हा या पक्ष्यांचा विणीचा हंगाम असतो.

टाळ-मृदंगाच्या गजरात विठू माऊलीच्या दर्शनासाठी निघणाऱ्या वारकरी मंडळीच्या दिंडयाप्रमाणे मान्सूनचे आगमन होताच आम्हा निसर्गसख्यांच्याही दिंड्याही जंगलाकडे निघतात. पण जंगलाच्या नियमाप्रमाणे त्या मुक असतात. कारण आमचा देव अरण्यात विविध सजीवांच्या रुपात देर्शन देत असतो. असेच एक दर्शन दक्षिण-पश्चिमेकडून मान्सूनबरोबर आलेल्या स्थलांतरीत सुंदर अशा नवरंग Indian Pitta पक्ष्याचे दर्शन मला झाले आणि मी धन्य झालो. ऋतुचक्रातील प्रत्येक ऋतु काहीतरी नवीन देत असतो. आपणास ती घेण्याची, शोधण्याची तयारी असली पाहिजे. मी ते प्रत्येक ऋतुत शोधत असतो. अनुभवत असतो. प्रसिध्द लेखीका दुर्गाताई भागवत म्हणतात- आम्ही निसर्गापासून दूर गेलो तरी निसर्ग आमचा पाठपुरावा करतोच. ऋतुंच्या रुपात तो प्रकट होतो आहे. पृथ्वीवर पडणाऱ्या काळाच्या या एका पावलात आणि आकाशात पडणाऱ्या दुसऱ्या पावलात सारे ऋतुचक्र सामावले आहे.

. . . . .

3 महासागराचा प्रवासी – सोनचिखल्या

कार्तिक मास अखेरच्या चरणात होता. अलीकडच्या काही वर्षापासून वर्षा ऋतू संपल्यानंतरही एप्रिल पर्यंत अधून मधून पाऊस हजेरी लावतच आहे. जागतिक तापमान वाढीमुळे दरवर्षी वादळे, ढगफुटी हे प्रकार आपण अनुभवत आहोत. भविष्यकाळात ते मानवासहीत सजीव सृष्टीसाठी धोकादायक ठरु शकते. निसर्गाच्या मनात काय आहे हे त्यालाच माहित. याला दोषीही आपणच आहोत, ही बाबही तीतकीच सत्य आहे. त्यामुळे नोव्हेंबर असूनही दरवर्षी प्रमाणे यावर्षीही पावसाळा संपल्यानंतरही प्रत्येक या पंधरवाड्यातही पावसाने हजेरी लावली होतीच. आजही काहीसे ढगाळ वातावरण होते. थंडीने गारठा अजून वाढला नव्हता. अशातच अमरावती जवळच्या नांदगाव पेठ टोल नाक्याच्या डावीकडच्या बोर धरण परिसरात पावलं पडली. धरणाच्या पश्चिम भिंतीवरुन एका ठिकाणी धरण तुडूंब भरल्याने पाणी ओसंडून वाहात होते. त्याला लागून जवळपास पाचशे फुट लांब व शंभर फुट रुंद सिमेंटचे मोठे टाके असून तेही पूर्ण भरुन ओसंडून वाहात होते. तो जणू जलतरण तलाव दिसतो. त्याला लागूनचा खालचा परिसर पाणथळ व गवती झुडूपांनी व्यापला आहे. त्यात नदी सुरय, तूतवार, शेकाट्या, कंठेरी चिखल्या, पाणभिंगरी इ. पक्ष्यांची पाहाटे अन्न शोधात गुंतले होते. शेकाट्या नर अन्न शोधता शोधता मादीशी सलगी करण्याचा उगीउगी प्रयत्न करत होता.

पूर्वेकडचा सूर्य धरणाच्या भिंतीवर आल्याने सोनपिवळा कोवळा प्रकाश या गवती पाणथळ परिसरावर पसरला होता. एका ठिकाणी वरुन गडद तपकिरी रंग असलेला, अंगावर पांढऱ्या रंगाचे अस्पष्ट ठिपकेवाला तुतवार पक्षी एकटाच अन्न शोध कार्यक्रमात गुंतला होता. यावेळी शेपटीचे टोक तो खाली वर करत होता. एवढ्यात एका अनोळखी पक्ष्याचे त्या परिसरात आगमन नजरेत पडले. आकाराने तूतवार पक्ष्याएवढा, डोके जाडसर, पिसे नसलेले पाय आणि कबूतरासारखी चोच होती. छातीवर रंगीबेरंगी तपकिरी-काळसर-पिवळसर रंगाची पिसे असलेला पाणथळीत इकडे-तिकडे धावून मध्येच तो थांबायचा. मग परत मान पुढच्या दिशेने खाली वळवून अन्न शोधत होता. हा होता परदेशी दुर्मिळ असा सोनटिटवा (Pacific Golden Plover) पक्षी. यालाच सोनचिखल्या असेही म्हणतात.

हिवाळ्यात पृथ्वीच्या उत्तरेकडून अनेक परदेशी स्थलांतरीत क्रौंच्च, करकोचा, राजहंस, कलहंस इ. पक्षी भारतात येतात. अत्यंत महत्वाची बाब म्हणजे हा सोनटिटवा पक्षी अलास्का ते भारत असा जवळपास 9,800 किलोमीटरचा प्रवास करुन येतो. दररोज सुमारे दोन हजार किलोमीटरचे अंतर तो पार करतो. येतांना अथांग असा दक्षिण पॅसीफीक महासागर तो मध्ये कोठेही न थांबता ओलांडतो. असा हा महासागराचा प्रवासी त्यानंतर भारतात पोहचतो. भारतात आल्यावर सोनचिखल्या भारतभरातील जलाशयाजवळील पाणथळ भागातील गवतात

दिसतो. याचे अन्न म्हणजे किडे-कीटकं, गोगलगाय, कोळंबी इ. आहे. येत्या अलिकडच्या दहा वर्षापासून हा पक्षी अमरावती शहरानजीकच्या काही जलाशयावर येतांना किंवा जातांना थांबतो. छत्री तलाव, बोर धरण येथे तो प्रामुख्याने दिसून येत आहे. बरेच पक्षी अभ्यासक त्याचे निरीक्षण करतांना दिसून येतात.

उन्हाळा जसजसा जवळ येतो तसतसा सोनटिटवाच्या पाठीवरचा रंग सोनेरी तर छातीखालचा भाग काळसर-पांढरा होतो. त्यावेळी हा एखादा सोनेरी पक्षीच वाटतो. यांचे थवे दमटसर गवताळ जमिनीवर, जलाशयाच्या काठावरील गवताळ पट्टे इ. ठिकाणी दिसून येतात. हिवाळ्यात तो भारतभर दिसून येत असून लक्षव्दिप, अंदमान आणि निकोबार बेटे, बांगला देश, पाकीस्थात, श्रीलंका येथे आढळतो. उत्तर सायबेरियात जून-जूलै महिन्यात यांची वीण होते. टूssई टूsssई असा सोनचिखलल्या आवाज काढतो. हा दुर्मिळ पक्षी अतीशय सावध आणि त्याच्या उडण्याच्या वेगामुळे शिकाऱ्यांसाठी आव्हानात्मक ठरतो.

त्रतूमानाप्रमाणे पक्षी दरवर्षी नियमितपणे स्थलांतर करतात. पक्षीजीवनातील ही एक नियमित निरंतर घडणारी प्रक्रिया आहे. स्थलांतरा दरम्यानच्या प्रवासात त्यांना वादळ, हिमवर्षाव, शिकारी इ. अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. या सर्व संकटांवर मात करुन ते आपला निर्धारित प्रवास पूर्ण करतात. भारतात स्थलांतर करुन येणारे पक्षी हे उत्तर ध्रृव, हिमालय, वाळवंट, महासागर पार करत युरोप, आशिया, सायबेरिया कडून येतात. दहा-बारा हजार

किलोमीटर प्रवास करणाऱ्या पक्ष्यांसोबत इतर पक्षी पण पूर्वेकडून पश्चिमेस व पश्चिमेकडून पूर्वेकडे स्थलांतर करतात. स्थलांतर करणारे पक्षी हे थव्याने प्रवास करतात.

विणीच्या हंगामात स्थलांतर करुन आपल्याकडे येणारे नवरंग, निळ्या टोपीचा कस्तूर, पर्ण वटवटया, निळा दयाळ तसेच तिरचिमरण्या, धोबी पक्ष्यांच्या विविध प्रजातीचा समावेश आहे. तसेच उत्तर धृवाकडून येणारे मालगुजा, पाणलावा, रोहित, राजहंस, कलहंस इ.पक्षी आहेत. हिवाळा संपला की हे स्थलांतरीत पक्षी आपआपल्या मूळ निवासस्थानाकडे परत जातात.

अती प्रमाणावर मासेमारी, जाळे लावून पक्ष्यांची शिकार, किटकनाशकांचा वापर. तसेच वृक्षतोड यामुळे स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांबरोबर स्थानिक पक्ष्यांचेही अधिवास संकटात येत आहेत. त्यामुळे बऱ्याच प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यासाठी खरी निकड आहे ती वृक्ष लागवड, त्याचे संवर्धन आणि संरक्षण करणे.

पक्षी माणसांशिवाय जगू शकतात परंतु माणूस मात्र पक्ष्यांशिवाय जगूच शकणार नाही, पक्षी नसतील तर मनुष्य जात नाहीशी होईल. हे निरीक्षण अधिक स्पष्ट करण्यासाठी असेही म्हणता येईल की झाडांशिवाय कीटक प्रजाती नष्ट होईल, कीटक नसतील तर पक्षी नाहीसे होतील, पक्ष्यांशिवाय झाडे जगू शकणार नाहीत आणि

कोणतीही दयामाया न दाखवणारे निसर्गाचे नियम पाहिले तर असे म्हणावे लागेल की झाडांशिवाय जग टिकू शकणार नाही.

गरम रक्त असण्याचा गुणधर्म, शरीरावरील पिसांचे आच्छादन व एकमेवव्दितीय अशी उड्डाण करण्याची शक्ती या त्रयीमुळे स्थलांतर क्रियेची घटना ही पक्ष्यांच्या बाबतीत पूर्णत्वास पोहचली आहे. खरे तर, उष्णता व थंडी यांच्या अतिरेकी परिणामांचा सर्वात कमी फटका पक्ष्यांना बसतो. पण थंडीच्या मोसमांत अन्न मिळवण्याच्या अडचणींमुळे त्यांना आपले वस्तीस्थान बदलावे लागते. तसे न केल्यास मृत्यू अटळ असतो. स्थलांतर केल्याने जगण्यास अनुकूल ठरणारे दोन वेगवेगळे प्रदेश पक्ष्यांना उपलब्ध होतात. त्यांचे मूळस्थान हे वीण घालण्याची, घरटी बांधण्याची जागा तर स्थलांतर करुन आलेल्या ठिकाणी त्यांना पुरेसे अन्न मिळते व विश्रांती घेता येते. निसर्गातील हे एक स्वयंसिध्द तत्व आहे की पक्षी आपल्या नेहमीच्या थंड प्रदेशाच्या ठिकाणी घरटी बांधतात, जसे की उत्तर गोलार्धात, त्यांची वीणीची ठिकाणे आर्टिक प्रदेशाच्या जवळ किंवा समशीतोष्ण कटिबंधात असतात आणि त्यांची हिवाळी मुक्क्माची ठिकाणे विषुववृत्ताच्या आसपास असतात. दक्षिण गोलार्धात याच्या उलट स्थिती असते. जरी स्थलांतराची काही उदाहरणे पूर्व ते पश्चिम अशी असली तरी सर्वसाधारणत: स्थलांतराची दिशा उत्तर ते दक्षिण अशीच असते. स्थलांतराच्या काळातील सर्वात अधिक अंतर (जाणे व परत

येणे) आर्टिक टर्न हा पक्षी पार करतो. आर्टिक प्रदेशाच्या हिवाळ्यापासून सुरु होणारा त्याचा प्रवास दक्षिणेच्या दिशेने सुरु होतो. मग सारे जग ओलांडून अंटार्टिक व तेथील उन्हाळा संपला की परत माघारी म्हणजे हे अंतर प्रत्येक फेरीत जवळ जवळ 17 हजार किलोमीटर पेक्षा जास्त असते.

वर्षभर पक्षी निरीक्षणाची आवड असणारे पक्षी अभ्यासक भ्टकत असतात. परंतु हिवाळा सुरु झाला की परदेशी स्थलांतरीत पक्ष्यांचे आगमन आपल्याकडे होते तसतसे पक्षीप्रेमींचे जथ्थे जलाशयाकडे जावू लागतात. यात मग काही दुर्मिळ व अतिदुर्मिळ पक्षी दिसू शकतात. ही अनामिक ओढ जीवनभर छंद म्हणून आनंददायी जीवनाचा प्रवास घडवत राहाते. निस्वार्थ वृत्तीने तो जोपासत राहिलं पाहिजे.

. . . . .

4

मधूबाजचा टापू

मे महिना असूनही वैशाखी उन्हामध्ये फारशी रखरख नव्हती. पहाटे पहाटे ढगाळ वातावरणात उन-सावलीचा खेळ सुरु होता. त्यातच दोन दिवसापूर्वी अवकाळी पाऊसही पडूल गेला होता. अमरावी-चांदूर रेल्वे रस्त्याने दुचाकीने आम्ही निघालो. रस्त्याच्या दुतर्फाचे वैशाखी वन बोडखे पडले असले तरी पिंपळ, कडूनिंब, जांभूळ इ. झाडांना हिरवी कोवळी वसंत पालवी फुटलेली होती. पोहरा गावातून एका कच्च्या रस्त्याने एका जलाशयाकडे वळलो. झुडूपी माळरानातून एका टेकडीच्या मध्यभागी पोहोचलो. गळ्यात दुर्बिन, कॅमेरा लटकवून एका सुपारीएवढ्या दगडांच्या उतरत्या घसरत्या पाऊलवाटेने तोल सांभाळत थेट तलावाच्या काठावर पावलं पडली.

दोन बाजूने टेकडयांच्या रांगेच्या मधे पायथ्यावरचे हे तळे पाण्याने भरलेले आहे. तळ्याच्या सभोवताल अर्जून, जांभूळ्, पिंपळ इ. मोठमोठ्या झाडांनी हिरव्यागर्द रुपात तळ्याला गर्द हिरव्या वनराईचं आवरण प्रदान केलं आहे. त्या मोठमोठ्या झाडांच्या सावल्या वन्यजीवांसाठी आरामदायी आहेत. कारण चितळ, रानडुक्करांचे कळप त्याखाली आपल्या अन्नशोध कार्यक्रमात व्यस्त दिसत होती. त्यापैकी काही पाण्यावर आपली तृष्णा भागवत होती. एवढ्यात डाव्या बाजूने एक रोही सुरक्षिततेचा अंदाज घेत घेत पाण्यावर उतरु लागला. मोर-लांडोचा एक थवाही पाण्यावर उपस्थित होताच. चितळ नराच्या क्वॉsक् क्वॉsक्sss आणि मोराच्या मियॉऊ मियाऊ आवाजाने परिसर भारावून गेला. वन्यजीवांचे वेगवेगळे आवाज हे वेगवेगळ्या कारणांसाठी इतरांना

सावध अथवा सूचित करण्यासाठी असतात. कारण एकमेकातील सहजीवनाचा तो एक प्रमुख भाग असतो. निरिक्षणासाठी कुठे तरी आसनस्थ व्हावे म्हणून मी व पक्षितज्ञ सुरेश खांडेकर सर डाव्या हातावरील एका बाभूळीच्या सावलीत बसण्याकरिता निघालो. तोच पुढ्यातून एक काळसर सात-आठ फुटाचा साप तळ्यातील पाणी पिवून वृक्षागाराकडे सरसर वेगाने निघाला. त्याचा वेग एवढा होता की हातातील कॅमेरा डोळ्यापर्यंत नेईपर्यंत तो वृक्षागारातील पालापाचोळ्यात गायब झाला.

बाभूळीच्या त्या गर्द छायेत आम्ही बैठक मांडली. पाण्यात पाणपक्ष्यांचा मनसोक्त विहार सुरु होता. तर पुढयातील तृणावर बुलबुल, नाचण, मैना, कोतवाल इ. पक्ष्यांची किलबिल सुरु होती. अधून मधून शाही बुलबुलही नकळत यायचा. एवढ्यात एक काहीसा नवखा पक्षी शंभर फुटावर उतरला. आकाराने चिमणीएवढा, भुवई आणि पंखावर पट्टी, छातीवर नारंगी रंग त्याखाली छातीपासून पोट आणि शेपटीपर्यंत पांढरा रंग त्याला शोभून दिसत होता. त्याच्या पांढऱ्या पार्श्वभागावर नारंगी पट्टा तर वरचा भाग काळा होता. यालाच पांढऱ्या पोटाचा गोमेट (White-bellied Minivet) असे म्हणतात. एवढ्यात तलावाच्या पलीकडच्या गर्द वृक्षराजीतून एक शिकारी पक्षी पाण्यावरुन आपल्या भल्या मोठ्या पंखाची उघडझाप करत येतांना दिसला. काही वेळातच आम्ही ज्या दिशेने बसलो होतो तीकडेच आमच्या डोक्यावरुन पाठीमागच्या सागावर जाऊन बसला. बसल्या

बसल्या आम्ही कसरत करत करत त्याची काही छायाचित्रे टिपली. तो होता मधूबाज (Oriental Honey Buzzard) नावाचा शिकारी पक्षी. बहूधा तो तहानलेला असावा कारण आमच्या उपस्थितीची जाणीव त्याला झाल्याने त्याने लवकरच तेथून उड्डाण भरली व पलीकडच्या रानात पसार झाला.

तळ्यावर निरव शांतता पसरली होती. चितळ, रानडुक्कर, मोर-लांडोरचे पाण्यावर ये-जा सुरु होती. एवढ्यात दोन शिकारी पक्षी उंच नभामध्ये घिरट्या घालत घालत दूरवर अस्पष्ट झाली. बहूधा ती शुभ्र नयन तिसा पक्ष्याची नर-मादी असावी. एवढ्यात काय आश्चर्य! थोड्या वेळापूर्वी येवून गेलेला मधूबाज परत आता आमच्या सरळ पुढ्यात पाण्याच्या काठावर उतरला. एका लहानशा दगडावर बसून तो वारंवार आपल्या सुरक्षिततेचा अंदाज घेत होता. वन्यजीवांचं एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे ते म्हणजे कितीही तहान लागू द्या आपल्या सुरक्षिततेला सर्वप्रथम प्राधान्य देतात. पाणी हे जीवन असलं तरी येथे येणारा प्रत्येक जीव आपला जीव सुरक्षित कसा राहिल याकडे कटाक्ष देत असतात. कारण जीवन-मृत्यूचा खेळ पाण्याशेजारीच जास्त चालत असतो.

मधूबाज या शिकारी पक्ष्याचे आमचे अंतर असावे केवळ शंभर-दिडशे फुट एवढे. क्षणाक्षणाला सुरक्षितता तपासून त्याचे आपली तृष्णा तृप्ती करण्याचे काम सुरु होते. आम्ही एकाच बैठकीवर बसून त्याची मनसोक्त छायाचित्रे टिपण्यात गुंग झालो होतो.

सूर्यप्रकाश विरुध्द बाजूने असल्याने छायाचित्रे घेतांना थोडी कसरत होत होती. पाण्यात चोच बुडवू बुडवू काहीसी वर करत तो पाणी पित होता. एकदाचे त्याचे पाणी पिणे झाले आणि बसल्या बसल्या आपल्या पंखांची हळूवारपणे उघडझाप करु लागला. हत्तीचे मोठमोठे कान जसे सुपासारखे दिसतात अगदी मला मधूबाज आपले पंख उघडून बसला असतांना वाटले.

मधूबाज हा दुर्मिळ शिकारी पक्षी असून तो ज्या टापूत दिसतो तो टापू जैविक विविधतेने समृध्द असल्याचे मानले जाते. पर्यावरण समृध्दीसाठीही ही बाब अत्यंत महत्वाची आहे.

मधूबाज हा घारीच्या आकाराचा शिकारी पक्षी आहे. याच्या रंगछटा वेळोवेळी बदलत असतात. तसा हा पक्षी करड्या रंगाचा असून डोके गडद करड्या रंगाचे असते. खालील अंग फिकट तपकिरी व त्यावर सफेदरंगी उभ्या-आडव्या रेषा असतात. त्याचा मानेवरील छोटा तुरा काळसर रंगाचा असतो. हा तुरा एका बाजूने पाहिल्यास दिसू शकतो. याचे पंख चंदेरी-करड्या रंगाचे असून त्याच्या खालील बाजूवर जवळ जवळ असणाऱ्या गडद रंगाच्या दंडरेषा असतात. त्याची फिकट करड्या रंगाची शेपटी टोकाला अर्धगोलाकार असते. तिच्या टोकाला रुंद काळसर रंगाचा आडवा पट्टा असून मध्यातही याच रंगाचा एक आडवा पट्टा असतो. या पट्टयांच्या अधेमधे फिकट रंगाचे पट्टे असतात. शेपटीवरील हे रेखांकन पक्ष्यापक्ष्यागणिक बदलू शकते. नर-मादी दोघेही सारखेच असतात. उड्डाण करतांना हे पक्षी सापमार गरुडासारखे दिसतात. परंतु त्यांच्या शिडशिडीत डोक्यावरुन आणि लांब मानेवरुन यांची वेगळी ओळख होऊ शकते. याच्या चंदेरी करड्या रंगाच्या आतील अंगावर अधिक गडद रंगाच्या रेषा आणि शेपटीवर दोन काळवसर पट्टे असतात. विपूल वृक्षराजी असलेल्या प्रदेशात तो राहतो. अर्ध-नागरी भागातील झाडी असलेल्या टापूतही त्याचा वावर असतो. बहुधा तो एकेकटा दिसतो. कित्येकदा ते एकत्र

वस्ती करतात. मोठ्या प्रमाणात मध व पोळयातील अळ्या, प्रसंगवश लहान लहान पक्षी, सरीसृप प्राणी, बेडूक, कीटक हे मधूबाजचं खाद्य आहे. आवाज कर्कश शिटीसारखा असतो. एप्रिल ते जून हा या पक्ष्यांचा विणीचा हंगाम असतो.

आपली तृष्णा येथेच्छ भागल्यावर पंखांची उघडझाप व साफसफाई केल्यानंतर मधूबाजने परत एकदा आपले मोठमोठे दान्हीही पंख उघडले. दगडावरुन हळूच पाय उचलू लागले. आणि एक उड्डाण घेत दूरवर नभात अदृश्य झाला. आम्हीही मधूबाजच्या आजच्या मनसोक्त दर्शनाचा मोरपिसारा मनात साठवून परतीच्या मार्गावर लागलो.

. . . . .

5 माळरानाचा शिकारी –

सापमार गरुड

पौषाच्या शुभारंभी पाखर पहाटे दुचाकीने जंगल भटकंतीस निघालो. दोन दिवसापूवी अवकाळी पाउस पडून गेल्याने वातावरणात गारवा वाढला होता. अमरावतीच्या पूर्वेकडे नांदगाव पेठवरुन सावर्डी आणि तेथून जळका शहापूर जलाशयाकडे पावलं पडली. जलाशयाच्या अलीकडे असलेल्या गवती माळरानात नानाविध पक्ष्यांच्या आवाजाचा कलरव सुरु होता. त्यात आघाडीवर होते पिवळ्या गाठीच्या माळटिटव्या. उंच पाय, मातकट तपकिरी रंगावर पांढऱ्या रंगाचे पोट, डोक्यावर काळ्या रंगाची टोपी व डोळ्यावर आणि समोर पिवळ्या रंगाची किंचीतसी लांबट गाठ असलेले हे सुरेख पक्षी टी-ई, टी-ई असा आवाज काढत होते. त्यांच्या आवाजामुळे तृणमेळ्याला जणू कंठ फुटला होता.

पुढे गवती माळरानातील पायवाटेने पायी भटकंती करता करता मुनियांचे थवेच्या थवे पुढ्यातून उध्ळायचे आणि बाजूच्याच बोरी-बाभळीच्या झुडूपावर जावून बसायचे. परत काही अंतरावर झुडूपावरुन उडून पगदंडीवर येवून बसायचे. थव्यामध्ये लक्ष वेधून घ्यायचा तो लाल-तांबडया चटणी रंगाचा काळ्या ठिपक्यांचा मुनिया नर. अहाहा...! काय त्याची सुंदरता ! निसर्गाने पक्षीकुळांमध्ये नरावर सौंदर्याची मुक्तपणे उधळण केली आहे, हे मुनिया नराच्या अनोख्या सौंदर्यावरुन लक्षात येते. सकाळच्या अन्न शोध कार्यक्रमात ते गुंतले होते. माळरानावरुन एक नजर दूरवर गेली तोच काळविटाचं एक पाच सदस्यांचं कुटूंब एवढ्या दुरुन आमच्या उपस्थितीची चाहूल

लागताच जागच्या जागी थांबलं. त्यांच्या डोळे आणि कानाच्या हालचालीवरुन हे लक्षात येत होतं. मात्र काळ्या पिळदार उभ्या शिंगाचा नर काळविटची सुरक्षिततेची धडपडही लक्षात येत होती. शेवटी अख्या कुटूंबाने आपली दिशा बदलली व पलीकडच्या रानात पसार झाले.

अथांग पसरलेल्या गवती माळरानातून पायी भटकता भटकता एका विजेच्या खांबाकडे लक्ष गेले आणि आमच्या उपस्थितीमुळे एका मोठ्या पंखाच्या शिकारी पक्ष्याने तेथून उड्डान भरले. दूरवर अंदाजे एक दिड किलोमीटरवरच्या कडुनिंबाच्या झाडावर तो जावून बसला. चांगली संधी साधून आली होती. चैतन्य आणि जोश संचारला. तसाच मी पायी पाठलाग सुरु केला. जवळपास दोन फुट उंचीच्या गवताला तुडवत तुडवत मी त्या दिशेने निघालो. दुरुनच साधारणत: एक हजार फुटावरुन त्याला कॅमेरात क्लीक करता करता त्या शिकारी पक्ष्याने आणखी एक उड्डान भरले. मी परत त्या तृणमेळ्यातून कशाचीही पर्वा न करता झपाझप पावलं टाकत पुन्हा दोन-तीन फर्लांग दूर असलेल्या त्या दिशेने निघालो. तो जवळपास तेथे वीस फुटाच्या झाडावर जावून बसला होता. आता दूरवरुनच त्याचे अंतर कमी कमी करत, धापा टाकत टाकत एक एक छायाचित्र कॅमेरात बंद करु लागलो. सारे लक्ष त्याच्या आणि कॅमेराच्या फोकसवर केंद्रीत केले होते. काही वेळ आजूबाजूला काय आहे याचे भानही हरपून गेले. जवळपास दहा मिनीटे या शिकारी पक्ष्याचे चित्रण केले तोच परत त्याने आपल्या भल्या

मोठ्या पंखाची हालचाल करत एक मोठ्ठी उड्डाण भरली आणि दिगंतरात अदृश्य झाला. हा होता सापमार गरुड इंग्रजीत याला Short-toed Snake-Eagle असे म्हणतात.

सापमार गरुड हा आकाराने काळ्या घारी एवढा तपकिरी रंगाचा, छाती खालील शरीर पांढऱ्या रंगाचे असून त्यावर गडद तपकिरी रंगाच्या रुंद रेषा असतात. डोके मोठे घुबडासारखे असून हवेत घिरट्या मारत असतांना चंदेरी करड्या रंगाचा दिसतो. याचे डोके गडद रंगाचे असून शेपटीवर साधारण: तीन आडव्या रेषा दिसतात. याचे पाय पिसविरहित असून नर-मादी जवळपास सारखेच दिसतात. एकट्याने खुल्या माळरानी प्रदेशात सापमार गरुड या शिकारी पक्ष्याचे मुख्य अन्न साप असून आपल्या तीक्ष्ण नजरेने ते गवतातील सरपटणारे जीव शोधून त्याची शिकार करतात. म्हणूनच याला माळरानाचा शिकारी असे म्हटल्या जात असावे. विणीच्या हंगामात या सापमार गरुडाची नर-मादी आकाशात विविध कसरती करतांना आढळून येते. यांचा विणीचा हंगाम डिसेंबर ते मे असा असतो.

गवती तृणमेळ्यातून जवळपास चार-पाच किलोमीटची पायी भटकंती करुन जळका शहापूर जलाशयाकडे निघालो. या वर्षीही पाऊस भरपूर झाल्याने जलाशय तुडूंब भरले होते. त्यामुळे पाणपक्षी फारसे दिसले नाहीत. परंतु उजवीकडच्या काठावर सात-आठ परदेशी स्थलांतरीत राजहंस पक्षी दगड-मातीवर बसले होते. त्यांना माझी

हलकीसी चाहूल लागली आणि उड्डाण भरले तोच जलाशयाच्या पूर्वेच्या काठावरच्या गवती वनस्पतीतून शेकडो राजहंसाचा थवा क्वॉग् क्वांग करत आम्ही उपस्थित होतो त्या भागाकडे येवू लागला. परंतु जवळपास येताच त्यांना या काठावरच्या राजहंसांनी उड्डाण भरलेली दिसताच त्यांनीही आपली दिशा बदलली आणि जवळच्याच शेवती तलावाकडे निघाले. जातांना नभातून शेकडो राजहंसाचा थवा हळूहळू लहान काळ्या ठिपक्या एवढा होवून अदृश्य झाला. आणि माझी पावलंही परतीवर माघारी वळली.

. . . . .

6 सारसाच देणं

पौष मासच्या सुरुवातीच्या चरणी भल्या पहाटेच गोंदियावरुन सारस पक्ष्यांच्या शोधात निधालो. बोचऱ्या थंडीचा जोर जास्त वाढला होता. दहा किलोमीटरवरच्या रावणवाडीनंतर जवळपास 12 किलोमीटरवर अंतरावरील कामठा गावाजवळ पोहोचलो. पुढयातील झिलमिली जलाशयाच्या परिसरात पाय ठेवताच गार वाऱ्याच्या झळूका अंगाला झोंबत होत्या. उजवीकडील तलाव आणि डावीकडील तोडणी झालेल्या धानशेतावर दुधाळ धुकं पसरलं होतं. तलावाला असंख्य पाणपक्ष्यांच्या आवाजाचा कंठ फुटला होता.

डोळ्याने दूरदूरपर्यंत सारस पक्ष्याचा शोध सुरु होता. परंतु त्या परिसरात त्याचे कुठेही अस्तित्व जाणवले नाही. पुढे वळसा घेवून झिलमिली जलाशयाच्या काठावर पोहोचलो. डावीकडे विमानाची जुनी धावपट्टी आणि उजवीकडे तलाव यामध्ये असणाऱ्या रस्त्यावर येवून आम्ही थांबलो. तलावाच धनवर, कुट, लालशिर बदक, पाणपिपुली, जांभळी पाणकोंबडी इ. पक्षी अन्नाच्या शोधात मग्न झाले होते. माझे नेत्र मात्र जलाशयाच्या

सभोवताल दूरदूरपर्यंत सारसाला शोधत होते. बराच शोध घेवून पुढील दीड किलोमीटरवरच्या परसवाडा तलावाकडे निघालो.

परसवाडा गावातून पुढे जातांना रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या प्रत्येक घराच्या चुनामातीच्या भिंतीवर विविध पक्ष्यांचे रंगीत चित्र हाताने काढलेले दिसत होते. सोबत प्रत्येक चित्राखाली त्या त्या पक्ष्याचे नावही दिले होते. येणाऱ्या जाणा-यांना हे सुंदर चित्र आकर्षित करत होते. त्यामुळे मुलांना निसर्गातील पक्षीकुळांचे प्राथमिक ज्ञान मिळते. मला व आमच्या चमूलाही हा प्रयत्न अत्यंत स्तूत्य वाटला. पुढे दोन्ही बाजूच्या धानाच्या शेतातून परसवाडा जलाशयावर पोहोचलो.

येथे तलावाच्या काठावर सुंदर असा निरीक्षण मनोरा उभारला आहे. तेथून दूरपर्यंत तलावातील पक्ष्यांचे निरीक्षण करता येते. हा तलाव असंख्य पाणवनस्पतींनी व्यापला आहे. मधेमधे पान वनस्पतीची बेटही दिसत होती. येथे नानाविध पक्षी अन्नाच्या शोध मोहिमेत दंग झाले होते. त्यांच्या निरीक्षणात बराच वेळ घालवला पण येथेही सारस नजरेत पडले नाही. सूर्य डोक्यावर येवू लागला होता. परतीची पावलं पडली. एवढ्यात गाईडकडून पलीकडच्या भागात सारसाच्या अस्तित्वाची बातमी मिळाली. आम्ही पटापट गाडीत बसून त्या भागाकडे निघालो.

तेथे पोहोचताच रस्त्यावर गाडीतून खाली उतरलो. सारसावर गेल्या तीन वर्षापासून अभ्यास करणारे मुकुंद धुर्वे यांनी बोटाने दूरवर असलेली सारसची जोडी दाखवली. धान कापलेल्या शेतात आमच्यापासून ती जवळपास एक हजार मिटरवर असावी. सारसाचे नर-मादी दोघेही थोड्याफार अंतरावर बसले होते. छायाचित्रणाच्या दृष्टीने अंतर जास्त असल्याने हळूहळू अंतर कमी कमी करत वाकत वाकत शेतातील मातीच्य ढेकलांमधून आम्ही पुढे पुढे सरकत होतो. पावलापावलावर सारसांना कॅमेरात टिपणे सुरु होते. अहाहा. कीती सुरेख रंगसंगती निसर्गाने सारसावर चढवली आहे. संपूर्ण शरीर करड्या रंगाचे, त्यावर चांदीसारखी झळाळी. गळा व मान लाल रंगाची, डोक्याच्या मधोमध टाळूवर करड्या रंगाचा ठिपका असून कानाजवळही करड्या रंगाचा पट्टा दिसत होता. डोळे लाल रंगाचे तर चोच जवळपास सहा इंचाची हलकीसी निमूळती असून ती हिरवट रंगाची दिसत होती. मान लांब असून पाय लांब तांबसर रंगाचे होते. पायाला लांब नखे असून ती आत मोडलेली होती. मानेवरच्या लाल रंगात वेलवेटसारखे उंचवटे दिसत होते. काही वेळातच त्यांना आमची चाहूल लागली आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने दोघेही सावध झाले. काही क्षण आम्हीही तेथेच थांबलो. परत हळूवार पावलांनी पुढे ढोपरावर सरकायला लागलो. आता ही जोडी एकमेकाजवळ येवून पाठमोरी होवून पलीकडे एका मोठ्या झुडूपाआड जावू लागली. दोघांमध्ये काहीतरी हितगूज सुरु होते.

एवढ्यात उड्डाणाकरिता दोघांनीही पंख फडफडवले आणि कुर्रर कुर्रर मोठ्याने आवाज करत त्यांनी नभात उड्डाण भरली. बऱ्याच दूरपर्यंत जावूनही त्यांचा आवाज स्पष्टपणे कानी पडत होता. काही क्षणात ती जोडी दिगंतरात नाहीसी झाली.

भंडारा, गोंदिया जिल्हयात सारस पक्ष्यांच्या संरक्षण आणि संवर्धनात श्री मुकंद धुर्वे या व्यक्तीचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. लहानपणापासून त्यांना सारसाचं आकर्षण होतं. ते म्हणतात- 1980-85 पर्यंत या भागात भरपूर सारस होते. परंतु त्यानंतर ते अत्यंत कमी कमी होत गेले. 1995 च्या आसपास वन्यजीव खात्याच्या प्रगणनेनुसार संबंध महाराष्टात अवघे चार सारस शिल्लक राहिले त्यानंतर मात्र श्री धुर्वे हे सारस पक्ष्यांच्या शोधात आणि संरक्षण व संवर्धनाच्या कामात त्यांच्या सहका-यांसोबत झपाटल्या गेले. सारसाची अंडी पळवणे, शिकार करणे, ज्यांच्या धान शेतात हे पक्षी घरटी करतात त्यांच्या पिकांचे सारस हे फार नुकसान करतात. त्यांची घरटी उध्वस्त करणे या बाबी त्यातून समोर आल्या. पण धुर्वे आणि त्यांच्या चमूने गावागावातील सरपंच, पोलीस पाटील, ग्राम पंचायत सदस्य, निसर्ग प्रेमी मंडळी, शाळेतील हरित सेनेचे शिक्षक व विद्यार्थी या सर्वांना सारस पक्ष्याबद्दल माहिती दिली व जनजागृती मोहीम हाती घेतली.

जनजागृतीमुळे यांच्या चमूला वेगवेगळ्या परिसरातील सारसाच्या अधिवासाची ठिकाणं कळली. त्याचे संरक्षण व संवर्धन केले. ज्या शेतात सारस पक्षी घरटी करतात अशा शेतक-यांना विश्वासात घेवून त्यांना शेतातील नुकसान भरपाई देण्यात येते. सारसाच्या अधिवासामुळे पिकाला सारस पक्षी हानीकारक असणाऱ्या किटकांचा कसा नायनाट करतात व नुकसान होण्यापसून कशी मदत करतो हे त्या शेतक-यांना पटवून देण्यात येते. वेळोवेळी व्याख्याने, सिनेमा स्लाईडव्दारे प्रबोधन करुन जनजागृती करण्यात येते. तसेच सारस पक्ष्यांची अंडी खाल्ल्याने बवासीर नावाचा दुर्धर आजर होतो हे सांगण्यात येते. श्री मुकुंद धुर्वे यांच्या दोन तपाच्या तपश्चर्येला आज यश आले आहे. आता भंडारा-गोंदिया जिल्हयात सारस पक्ष्यांची जवळपास 80 च्या आसपास संख्या पोहचली असल्याचे त्यांनी सांगितले.

सारस पक्षी भारतात गंगेचे खोर, उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात, हरियाणा, आसाम, नेपाळ, पश्चिम बंगाल या भागातील नद्यांच्या पात्रात, उथळ पाण्याच्या तलावात आढळतात. तर मध्य भारतात तलावांच्या व धानपिकांच्या भंडारा-गोंदिया जिल्हयांत आढळतो. हा पक्षी स्थानिक असून एक जोडी तयार झाल्यावर त्यांचे घरटे, अधिवास हे त्या जोडीने प्रमाणित केलेले असते. दरवर्षी ते एकाच भागात आपली घरटी तयार करतात. एका सारस जोडीच्या अधिवास क्षेत्रात दुसरी जोडी लुडबुड करीत नाही. पिल्लं पूर्णता तरुण झाल्यावर

उन्हाळ्यात आई-वडीलांपासून ते अलग होवून आपलं स्वतंत्र अस्तित्व निर्माण करतात. ज्यांच्या जोड्या झाल्या नाहीत ते सर्व एकत्र जमून थव्याने राहातात. ज्या ठिकाणी अन्न, सुरक्षा व लपण आहेत अशा ठिकाणी ते एकत्र राहतात. जोडी जमविण्यासाठी मादीसमोर नर आकर्षक असे नृत्य करतो. यावेळी मान खाली वर करणे, पंख लांब पसरवणे, लहान काड्या किंवा गवताच्या ओंब्या ते एकमेकांवर फेकतात. हे करतांना मादीची मान खाली असते. तर नराची मान वर व चोचही वरच असते. तसेच पंख लांब पसरवलेले असतात. एकदा जोडी जमल्यावर पावसाळ्यात ते आपल्या भावी संसारासाठी थव्याचा त्याग करुन अखेरच्या क्षणापर्यंत एकमेकांसोबत राहातात. नर-मादीच्या जोडीतील एखादा मरण पावला तर दुसरा जोडीदार त्या क्षणापासून अन्न त्याग करुन आपलं जीवन संपवतो. श्री मुकुंद धुर्वे यांनी अशा एका जोडीचे स्वता निरीक्षण केले आहे.

भंडारा-गोंदिया परिसरातील परसवाडा, झिलमिली, शृंगारबन, लोहारा, बाजारटोला, गंगाझरी, गोठणगांव या तलावात सारस जून ते ऑक्टोबरमध्ये घरटी करतात. पावसाळा जास्त प्रमाणात असला तर पुरुषभर पाण्यावर तर कमी पाऊस होणार असेल तर धानाच्या शेतात टोंगळ्याएवढ्या पाण्यावर घरटी करतात. घरटी करतांना बोडीत उथळ पाण्यात आजूबाजूचे गवत उपटून ते घरटी तयार करतात. तर भाताच्या शेतात भापपिके उपटून घरटी करतात.

घरटे जवळपास पाच ते सहा फुट परिघाचे असून तीन फुट उंच असते. त्यात मादी दोन किंवा तीन पांढऱ्या रंगाची अंडी घालते. अंडी उबवण्याचे कार्य नर-मादी दोघेही करतात. वजनाने अंडे 200 ते 240 ग्रॅम एवढे असते. पांढऱ्या रंगाच्या अंड्यावर तांबूस रंगाचे ठिपके असतात. 28 ते 31 दिवसानंतर अंडी उबवून पिल्लं बाहेर येतात. तेव्हा त्यांचा रंग पिवळसर असतो. त्यानंतर हळूहळू तांबसर रंगाचे होतात. काही दिवस नर-मादी पिल्लांना अन्न भरवण्याचे काम करतात. पिल्लं मोठी झाल्यावर स्वताचे अन्न स्वताच मिळवतात. काही धोका असल्यास आई-वडील विशिष्ट आवाज करुन पिल्लांना सावध करतात. 50-60 दिवसानंतर पिल्लं लहान लहान उड्डाण भरायला लागतात. सारस हा पक्षी मासभक्षी व तृणभक्षी असून लहान किडे, मासे, लहान साप, सरडे, बेडूक व पाण वनस्पती, कंद, बीया, धान व गहू हे त्यांचे अन्न आहे.

घरट्यात अंडी घातल्यानंतर कोल्हे, लांडगे, कुत्रे, कावळे, शिकारी पक्षी, साप असल्यास माय बाप अतिशस सतर्क असतात. यावेळी शिका-यांना ते पळवून लावतात. वेळप्रसंगी आपल्या मोठया चोचीने हल्ला करतात. Monocrophos व Dieldrrin किंवा Themate हे रसायन लागलेले अन्न खाल्ल्याने सारसाची पिल्लं दगावतात. उडतांना कधीकधी हा पॉवर इलक्ट्रीक तारेच्या संपर्कात येवून दगावतात. मात्र ज्या शेतक-यांच्या शेतात घरटी असतात त्यांच्यावर सारस कधीही हल्ला करत नाहीत. अनोळखी व्यक्तीवर ते हल्ला करतात.

महर्षी वाल्मिकींना रामायण हे महाकाव्य सुचण्यास सारस पक्षीच कारणीभूत आहे. महाकवी कालिदास यांच्या मेघदूत काव्यात या पक्ष्याचा सारस क्रौंच्च असा उल्लेख आहे.

भंडारा-गोंदिया भागातील गोंड जमातीचे आदिवासी पाच देवापैकी एक सारस पक्ष्याला मानतात व त्याची पूजा करतात. गुजरातमध्ये आजही ग्रामीण भागात नव वरवधूला लग्नानंतर सारसाची जोडी दाखवतात. पक्षी दिसला नाही तर त्यांचे चित्र त्यांना दाखविण्यात येते.

सारस पक्षी आपल्या शरीरावरील विशेष म्हणजे मानेचा रंग व आवाजातील बदल याव्दारे ते एकमेकांना सतर्क करतात. तसेच आनंद व्यक्त करतांनासुध्दा त्यांच्या मानेजवळील रंग अजून उजळ होतो. नभात उडतांना सारस पक्ष्यांचा थवा इंग्रजी व्ही आकारात उडते. घरट्याजवळील अंडी नष्ट झाल्यास लगेच दुसऱ्या ठिकाणी घरटी तयार करुन अंडी घालतात. सूर्य माथ्यावर आला होता. थोडेफार उन्हाचे चटके जाणवायला लागले होते. चार तासाच्या धावपळीमुळे चेहरेही थकवा आल्यागत झाले होते. सारसाच्या दर्शनाने धन्य झाल्यासरखे वाटत होते. लगेच आम्हीही परतीवर लागलो.

. . . . .

7 … तो राजहंस एक

भल्या पहाटे पौषाचा बोचरा वारा अंगावर घेत घेत डांबरी सडक ओलांडून एका दगड-धोंडयाच्या रस्त्यावर पावलं पडली. उजव्या बाजूने तांबडया-सोनपिवळया रंगातील तृणमेळा दूरदूरपर्यंत पसरला होता. रानचिमणी, तिरचिमणी, चंडोल, वटवटया, शिंपी इ. रानपाखरांची अन्न मिळविण्याची धावपळ सुरु होती. बाभळीच्या लहान मोठया झाडाझुडूपांवर बुलबुल, मैना, खाटीक इ. पक्ष्यांची लगबगही लक्ष वेधत होती. साऱ्या तृणमेळयाला जणू कंठ फुटला होता.

सूर्यगंगा तलावाकडे जाणारी ही रानवाट. काही अंतरावरील तृणमेळयातील अचानक एका हालचालीने लक्ष वेधले. कंबरेएवढया सोनेरी-मातकट गवतात दूरवर निलगाईचे दोन-अडीच वर्षाचं पाडस लपत छपत सावधपणे झुडूपाआड होवू लागलं होतं. माझी नजर अवती भोवती फिरु लागली. पुढे पंधरा निलगाईचं अख्खं कुटूंब त्या पाडसाची वाट पाहात ऊभं होते. त्यात अत्यंत बळकट देहयष्टीचा, हनुवटीवर दाढी फुटलेला कळपाचा नायक नर कान आणि डोळे टवकारुन सुरक्षिततेचा आढावा घेत ऊभा होता. मी दूरवरुनच त्याची सावधपणे छायाचित्र घेवू लागलो. परंतु रानसखा कुमार पाटील कळपाच्या जवळपास दोन-तिनशे फुट अंतरावर पोहचून व्हिडीओ चित्रण घेत होता. कमी अंतरामुळे प्रमुख नर अतिसावध झाला. कारण कुमार लक्ष्मणरेषेपर्यंत पोहचला होता. प्रसंगावधान ठेवून पावलं माघारी फिरली आणि थेट जलाशयावर पोहचलो.

पूर्वेकडच्या पहाटकिरणांत सूर्यगंगा जलाशय उजळून निघालं होतं. तलावाच्या तीनही बाजूने तुरळक वृक्षराजी व गवताळ रमणे आणि पश्चिमेकडे जलाशयाची आडवी भिंत होती. तलावातील पाण्याच्या मध्यभागात असंख्य परदेशी स्थलांतरीत पक्ष्यांचा मेळा शांतपणे मुक्तविहार करत होता. अधूनमधून येणाऱ्या आँग आँगsss आवाजाने जलाशयालाही कंठ फुटत होता. तो होता देखण्या राजहंस पक्ष्यांचा थवा. तलावाच्या काठावर चित्रबलाक, पाणटिटवा, चार्ली, पिवळया नाकाची टिटवी, कंठेरी चिलखा इ. पाखरांचा पोट भरण्याचा सपाटा सुरु होता. राजहंसाचे आमच्यापासून अंतर फार जास्त असल्याने आणि प्रकाशाची दिशा बदलत असल्याने आम्ही दोघेही भिंतीवरुन जलाशयाच्या पलीकडच्या काठावर पोहचण्याकरिता निघालो. काळी वेळातच त्या दिशेला पोहचून एका बाभळीच्या सावलीत पाठीवरील अनावश्यक सामान ठेवले आणि कॅमेरा व गळयात दुर्बिन लटकून पुढयातील लहानशा टेकडीकडे सावधपणे निघालो.

दगड-धोंडयाच्या या टेकडी पलीकडून लागूनच जलाशयाचा काठ असल्याने हळूवारपणे पोटावर घासत घासत वर चढलो आणि पुढयातील दृश्य पाहून क्षणभर बोबडीच वळली. शेकडोच्या आसपास शुभ्र पांढऱ्या रंगाचे, डोक्यावर दोन काळे आडवे पट्टे, पांढऱ्या मानेवर काळया उभ्या रंगाचे दोन उतरते जाड पट्टे असलेले देखणे राजहंस होते. जलाशयातील चंदेरी पाण्यावर शेकडे सुंदर सुंदर पांढरी कमळ फुलं उमलावी तसे हे दृश्य होते.

त्यातील काही आपले अन्न शोधत होते तर काही बसून मानेत आपली चोच खूपसून शांत बसले होते. जलाशयातील एका लहानशा मातीच्या बेटावरच्या दगडांवर त्यांची पांढरी विष्ठा तर मातीवर लहान-लहान पांढरी पिसं पडलेली दिसत होती. थव्यातील बहूतेक सर्व राजहंस शरीराने अतिशय सुदृढ वाटत होती. या देखण्या राजहंस पक्ष्याच्या वर्णनाबद्दल पुढील शब्द तंतोतंत लागू होतात.

एके दिनी परंतु पिल्लास त्या कळाले, भय वेड पार त्याचे वाऱ्यासवे पळाले

पाण्यात पाहतांना चोरुनिया क्षणैक, त्याचेच त्या कळाले तो राजहंस एक ||

आता अख्खा जलाशय आणि हा संपूर्ण थवा पुढयात होता. नजरेसमोरील दृश्याने रोमरोमात नवचैतन्य पसरलं होतं. मात्र कॅमेरा लहान असल्याने चांगले छायाचित्र घेण्याकरिता हळूवारपणे काठावर पोहचण्याकरिता टोंगळे आणि ढोपराचा वापर करीत एक-एक फुट घासत पुढे जात होतो. एकदाचं कसंबसं अगदी काठावर पोहचलो. राजहंसांचे अंतर असावे अंदाजे दोनशे फुट.

पृथ्वीतलावर सजीवसृष्टीची प्रथम उत्पत्ती पाण्यातच झाली. त्यानंतर ते भूभागावर आले. परंतु मानवासहीत संपूर्ण सजीवांना जीवंत राहण्यासाठी सर्वात आवश्यक गरज म्हणजे पाणी. धरणं, जलाशय आहेत म्हूणन सजीव आहेत. जेथे पाणी तेथे जैववाणी. त्यामुळे जेवढी जास्त पाणीसाठे निर्माण होतील, तेवढी तेथे सजीवसृष्टी वाढीस

लागेल. पक्षी हे पर्यावरण संतुलनात अत्यंत मोलाचा हातभार लावत असतात. म्हणून तर दरवर्षी लाखोच्या संख्येत परदेशी स्थलांतरीत पक्षी पृथ्वीच्या उत्तरेकडून आशिया खंडाकडे विविध जलाशयांवर येतात. आपला भारत देश हा त्यातील एक सर्वात महत्वाची भूमि.

सूर्य पाठमोरा होऊ लागला होता. उन्हे उतरु लागली होती. चेहरे ओरबाडल्यागत झाले होते. थकवाही जाणवू लागला होता. सूर्यगंगा जलाशयावरील देखण्या राजहंस पक्ष्यांच्या दर्शनाने धन्य वाटत होते. पावलं माघारी फिरता फिरता शब्द गुणगुणत होतो-

एका तळ्यात होती बदके पिले सुरेख
होते कुरुप वेडे पिल्लू तयात एक

कोणी न त्यास घेई खेळावयास संगे
सर्वाहुनी निराळे ते वेगळे तरंगे
दावूनी बोट त्याला, म्हणती हसून लोक
आहे कुरुप वेडे पिल्लू तयात एक

पिल्लास दु:ख भारी, भोळे रडे स्वत:शी
भावंड ना विचारी, सांगेल ते कुणाशी?
जे ते तयास टोची दावी उगाच धाक
आहे कुरुप वेडे पिल्लू तयांत एक

एके दिनी परंतु पिल्लास त्या कळाले
भय वेड पार त्याचे वाऱ्यासवे पळाले
पाण्यात पाहतांना चोरुनिया क्षणैक,
त्याचेच त्या कळाले तो राजहंस एक.

8 हिरवं तळं

पाणलावा नर

शरद ऋतुतील कार्तिक मास म्हणजे नानारंगी फुलांच्या उत्सवाचा महिना. त्यात सकाळी पडणारी गुलाबी थंडी आणि काही प्रमाणात परिसरावर पांघरणारे धुके. वर्षा ऋतू संपला की माझी पावलं पक्षी निरीक्षणाकरिता तळयांकडे पडू लागतात. दिवाळीचा सण आटोपून नुकतेच दोन दिवस झाले होते. यावर्षीचा पावसाळा बराच लांबल्याने नोव्हेंबरच्या सुरुवातीच्या आठवड्यातही रोज पावसाच्या एक दोन सरी येवून जात होत्या. त्यामुळे पूर्वेकडचा पहाटेचा सूर्यकाशही थोड्याफार ढगांमधून बाहेर पडण्याचा काहीसा आटापिटाच करत होता. आमचा परिसर तसा शहराच्या काठावरील असल्याने बोरी-बाभळीचा झुडूपी जंगलसदृश्य भाग आहे. कुठे अधेमध्ये लहान-सहान पाण्याची तळे साठलेली दिसतात.

शहराचा शेवटच्या वसाहतीचा हा भाग असल्याने एका ठिकाणी जवळपास एक एकर जागेत वसाहतीतील सांडपाणी एकत्र होवून त्याला तळ्याचे स्वरुप आले आहे. हे पाणी वाहाते नसल्याने पाण्यावर शेवाळी वनस्पतीचे राज्य पसरलेले आहे. त्यामुळे संपूर्ण तळ्यावर हिरवा रंग पसरला आहे. या हिरव्या तळ्याच्या पूर्वेकडचा भाग माणूसभर ऊंचीच्या लई गवताने माजला असून दोन-चार ठिकाणी बोरीची दहा-बारा फुटाची झाडे आहेत. तळ्याच्या पाणथळीत दोन-तीन फुटांचे काटेरी बाभूळ, बोर, काटबोर,बोरु गवत इ.गोतावळा मिळून जवळपास एक फुट परिघापासून तीन-चार फुट परिघाएवढी असंख्य झुडपे आहेत. तर उत्तरेकडे पाचशे फुटावर सांडपाण्याचा

ओढा वाहत असून त्यावरील काठावर बाभळी, बोरीची मोठमोठी वाढलेली झाडे एकमेकात घट्ट हात घालून आनंदानं जीवन जगत आहेत. या दिवसात हिरव्या बाभळींना सध्या पिवळीगर्द फुले लवडली आहेत. तर तळ्याचे निरीक्षण करण्याकरिता फक्त एकच मार्ग आहे, तो म्हणजे मुख्य रस्त्याचा काठ. तेथून तळे जवळपास तीस-चाळीस फुटावर आहे. या काठाने तरोटा, गोखरु, हिवर आणि रायमूनियाची असंख्य झुडूपांची एक भिंतच उभी झाली असून त्यावर लाल फुलांची गणेशवेल, पिवळ्या फुलांची रानदोडकीची वेली पसरल्या आहेत. घाणेरी तर गुलाबी-पिवळ्या मोतीदार फुलांनी बहरली आहे. नानाविध रंगाच्या फुलांनी जणू ताटवेच अंथरलेली ही झुडपी भिंत.

या हिरव्या तळ्यात पांढऱ्या छातीच्या पाणकोंबड्यांची अन्न शोधायची हालचाल दिवसभर सुरुच असते. काही ठिकाणी साधक अवस्थेतील ढोकरी बगळा शिकारीसाठी टपून बसलेला दिसून येतो. तूतवार पक्षीही अन्नासाठी येणे-जाणे करत असतो. झुडपांवर मुनिया, बुलबुल, वटवट्या, शिंपी इ. पक्ष्यांची हालचाल सुरुच असते. तळ्याचे निरीक्षण करता करता काही क्षणाकरिता मासे, साप, बेडकं इ. हालचाली मधून मधून दिसून येतात. तर तळ्यातील किडे – किटकं खाण्यासाठी खंड्या, निळकंठ, कोतवाल, बुलबुल, वेडा राघू इ. पक्ष्यांच्या नाना कसरती सुरु असतात. त्याबरोबर अधून मधून तळ्यावर चितूरांचे थवेही येवून निघून जातात. पलीकडच्या

नाल्यातून तित्तिराचे निलू, निलू, निलू... आवाजही नर-मादी एकमेकांना साद घालतांना ऐकू येतात. हा पक्षी आपल्यापासून पाच-दहा फुटावर असूनही तो सहसा दिसून पडत नाही. आवाज मात्र सुरुच असतात. तो एकप्रकारे आपली भुलभुलैय्या करत असते. निसर्ग हा जीवनशक्तीनं एवढा समृध्द असतो की, जाणं-येणं हे नित्य घडतच असतं.

काही वेळाने या हिरव्या तळ्यातील काठावरील एक फुट लांबीच्या हिरव्या मखमली गवतात दोन वेगवेगळ्या रंगाच्या नर-मादी पक्ष्याची हालचाल नजरेत पडली. मादी पुढे पुढे तर नर मागे मागे जात तेथील माणूसभर ऊंच गवतात पसार झाले. ते होते रंगीत पाणलावा (Greater painted Snipe)चे जोडपे. बराच वेळ शोधूनही ते बाहेर आले नाहीत. मीही परतीवर फिरलो ते दुसऱ्या दिवशी पहाटे येण्याकरिता.

कोवळी सूर्यकिरणं हिरव्या तळ्यावर पसरु लागली होती. तळ्यातील एका लहानशा झुडपाबाहेर पाणलावा पक्ष्याचा नर आपल्या लांब टणकदार चोचीने स्वत:चे पंख साफ करण्यात मग्न झाला होता. लांब शेपटी, सरळसोट परंतु टोकाला किंचित खाली वळलेली चोच. रंगाने ऑलिव्हसारखा असून त्यावर तपकिरी व काळसर रेषा आणि खुणा, खालील अंग मुख्यत: तपकिरी आणि सफेद रंगाचे. डोळ्याभोवती पांढरट रंगाची वर्तुळे तसेच डोळ्यामागे पांढऱ्या रंगाचा धब्बा आणि खांद्यावरुन छातीकडे जाणरे पांढऱ्या रंगाचे पट्टे या हमखास खुणा. मान आणि

छातीवर, तपकिरी आणि काळ्या रंगाचा लवलेश नसल्याने नर मादीपेक्षा कमी नखरेल दिसतो. हे पक्षी एकेकटे अथवा विरळ गवतात बोरु गवताच्या दलदलीत आढळतात. नराचे पंख साफ करण्याचे काम पूर्ण झाल्यावर अंग झडकून रंगीत पाणलावा नर अन्न शोधण्यासाठी पृष्ठभाग खाली-वर करत आपली लांब चोच पाण्यात खुपसून पाण्यातील लहान-सहान काड्या ओढून बाजूला करत होता. यावेळी अहाहा... काय ती रंगसंगती! हे पाहून मी थक्क झालो. लांब टणक चोच. तांबट-काळपट रंग. डोळ्याभोवती पांढरे कडे. छातीपासून खाली पांढरा रंग. पाठीवरुन दोन पांढरे पट्टे थेट डोक्यापर्यंत जावून दोन्ही खांद्यावरुन थेट गळ्याच्या खालपर्यंत पसरलेले. गळ्याभोवती हा पांढरा पट्टा मोत्याच्या हाराप्रमाणे मादीच्या गळ्यात शोभून दिसतो. सर्वात महत्वाची बाब म्हणजे पक्षीकुळामध्ये बहूतेक नर हे मादीपेक्षा अधिक सुंदर असतात. परंतु या रंगीत पाणलावा पक्ष्यामध्ये याउलट आहे. मादी हीच नरापेक्षा अधिक सुंदर आहे. माझे निरीक्षण आणि छायाचित्र टिपण्याचे काम सतत सुरुच होते.

पाणलावा मादी

आपला पृष्ठभाग पाण्यातील किडे-किटकं बाहेर येवून ते चोचीने टिपल्या जातात. अन्न शोधत शोधत नर झुडपासून पलीकडे जायला निघाला. तोच या लहानशा झुडपातून हळुचपणे पाणलावाच्या मादीने आपले अंग सुरक्षितपणे बाहेर काढले. पाणलावाच्या मादीवर निसर्गाने किती कुशलपणे रंगाचा ब्रश फिरवला आहे,

काही वेळाने तळ्यात पलीकडे गेलेला रंगीत पाणलावाचा नर परत त्याच झुडपाजवळ आला. सर्व काही शांतपणे सुरु होते. अचानक एक ढोकरी उडत येवून या झुडपाजवळ हातभर अंतरावर उतरला. दोघांची नजरा नजर झाली. पाणलावा नराने अटीतटीच्या परिस्थितीचा अंदाज घेतला आणि त्याने ताबडतोब आपले पंख पसरवले. आणि पाय दुमडून मान खाली घेवून सुरक्षिततेच्या पवित्र्यात झाला. ढोकरीमुळे यांच्या अधिवासावर संकट उभे ठाकले होते. जवळपास चार मिनिटानंतर अचानक ढोकरीने तेथून एक उड्डाण भरले नी दूरवर निघून गेला. संकट टळले होते. पाणलावा नर उठून उभा झाला आणि परत पंख झडकून अन्न शोधाच्या कामात गुंतून गेला. परंतु मला यामुळे पाणलावाच्या झुडपातील घरट्याचा अंदाज आला होता. त्यामुळे मी आनंदित झालो होतो. कारण आता प्रत्येक चकरात त्या जागेकडे लक्ष केंद्रीत करावयाचे होते. तसा रंगीत पाणलावा पक्ष्यांचा आळीपाळीने अन्नशोध कार्यक्रम दिवसभरही सुरुच असतो. एक मात्र नेहमीच्या झुडपातच बसलेला असतो.

कार्तिक पोर्णिमेच्या दिवशी मी सकाळपासून या हिरव्या तळ्यावर निरीक्षण करत होतो. दुपारी उन्हेही थोडेफार तळपायला लागली होती. चटके जाणवत होती. सायंकाळी साडेचार वाजता पाणलावाची मादी अन्न शोधत होती. शोधता शोधता तीने पाण्यात चार-पाच वेळा डुबक्या घेतल्या. आंघोळीसारखा हा प्रकार होता. पक्षी तसे उष्ण रक्ताचे असतात. परंतु ज्यावेळी त्यांना शरीराचे तापमान जास्त वाढल्याचे जाणवू लागते त्यावेळी ते पाण्यात स्वत:ला भिजवतात आणि शरिराचे तापमान राखतात.

काही वेळानंतर पश्चिमेला लाल-तांबट रंगाचा सूर्य मावळतीला चालला होता. तर त्याच क्षणी पूर्वेकडून कार्तिक पोर्णिमेचा चंद्र वर येण्यास सुरुवात झाली होती. हळूहळू चंद्रप्रकाश या शेवाळी हिरव्या तळ्यावर पसरु लागला होता. शेवाळाच्या आवरणामुळे चंद्राचे प्रतिबिंब पसरट दिसत होते. पक्ष्यांच्या हालचाली थंड झाल्या होत्या. किडे-किटकांचे आवाज तळ्यावर पसरु लागले. पाण्यातील जीवही श्वास घेण्याकरिता हळूच आपले मुंडके वर काढत होते. त्यावेळी चुबुक् असा आवाज येत होता. जणूकाही त्यांना पोर्णिमेचा चंद्र पाहावयाची घाई झाली होती.

परत एका सुट्टीच्या दिवशी सकाळी सकाळी हिरव्या तळ्यावर पोहोचलो. पाणकोंबड्याचे पळापळीचे उद्योग सुरुच होते. तळ्याच्या पलीकडे एका लहानशा डबक्याच्या काठावर ढोकरी शिकारीसाठी टपून बसला होता.

तळ्यातील पाण्याने हलकासा काठ सोडला होता. किंचीतसा चिखलयुक्त भाग मोकळा झाला होता. तळे तसे शांतच होते. मीही शांतपणे उभा राहून तळ्यातील हालचालीवर बारीक लक्ष ठेवून होतो. रंगीत पाणलावाची जोडीही आज कुठे दिसत नव्हती. बराचवेळ गेला आणि काय आश्चर्य! तळयाच्या मध्यातील एका झुडपाजवळ नरासोबत पाणलावा पक्ष्याचं इवलसं पिल्लू नजरेत पडलं. पिता समोर समोर तर पिल्लू मागे मागे फिरत होते. नर पाण्यात चोच खूपसून अन्न मिळवण्यात गुंग होता. पिल्लूही मागोमाग तसचं करायचा प्रयत्न करत होतं. आपण लहानपणी जसं मोठयांचं अनुकरण करतो तसाच हा पिल्लाचा प्रयत्न होता. हिरव्या तळ्यात एक जीव वाढला होता. मलाही हे दृश्य पाहून अत्यंत आनंद झाला होता.

रंगीत पाणलावा हे पक्षी भारतात १५०० मिटर उंचीपर्यंत हिमालयात, बांगलादेश, पाकीस्थान, श्रीलंका, म्यानमार येथे आढळतात. तसेच ते निवासी आणि स्थानिक पातळीवर स्थलांतर करतात. बोरु गवताने व्यापलेल्या दलदली, झील आणि तलावांचे काठ येथे आढळतात. उडतांना तो वेडावाकडा उडतो. लायक नर मिळविण्यासाठी मादी इतर माद्यांशी भांडाभांडी करते. वनस्पतीजन्य पदार्थ, कीडे, किटकं, गोगलगायी हे पाणलावाचे खाद्य आहे. विणीचा हंगाम वर्षभरात केव्हाही असतो.

व्यंकटेश माडगूळकर ऊर्फ तात्या त्यांच्या ‘एक एकर’ पुस्तकात म्हणतात- ‘एक एकरात केवढा तरी समृध्द निसर्ग दिसतो. माझ्या एक एकरात जिथं पाहावं तिथं असा हिरवा देव आहे’. गेल्या तीन-चार दशकाच्या निसर्ग भटकंतीनंतर त्यांचे हे म्हणणे मलाही पूर्णपणे पटले. एक एकराच्या या हिरव्या तळयात मलाही तोच देव दिसून आला.

. . . . .

9 वैशाखाचं देणं :

निळया शेपटीचे

पाणपोपट

रखरखता वैशाख पूर्ण भरात होता. भल्या पहाटे नल-दमयंती धरणाच्या जलाशयाच्या पश्चिमेस पावलं पडली. सूर्य आणि ढग यांच्यात लपाछपी सुरु असल्याने संपूर्ण जलाशयावर शितल छाया पसरली होती. पाण्याच्या लाटांना स्पर्शून आलेल्या गार वाऱ्याच्या झुळूका चैतन्यदायी वाटत होत्या. धरणातील पाणी कमी झाल्याने काठावर दूरपर्यंत हिरव्या गवताची शाल दूरपर्यंत पसरली होती. पलिकडे मात्र पूर्वेकडे क्षितिजापर्यंत निळशार अथांग पाणी पसरलं होतं. काळे कंकर, पांढऱ्या मानेचे करकोचे, शेकाटया, पाणकावळे, पाणबगळे इ. पक्षी पहाटे पहाटे अन्न मिळविण्यात गुंग झाले होते. नदी सूरय पक्षी चिरक् चिक् आवाज करत पाण्यातील आपले भक्ष्य टिपत होता. काठावरच्या हिरव्या शालूवर लहान-सहान पंकोळी, आर्ली, सूरय इ. पाखरांच्या हालचाली लक्ष वेधत होत्या. त्यात आकाराने लाव्यापेखा लहान असलेल्या पाठीवर उदी, खालून पांढरा, डोके गोल, जाड, पाय पिवळे, चोच लहानशी आणि शुभ्र कपाळ, डोळयाभोवती काळा रंग, गळयाभोवती पांढरा टवटवीत पट्टा असलेल्या कंठेरी टिटवा(Little ringed Plover) पक्ष्यांच्या हालचाली लक्षवेधी होत्या. हिरव्या-हिरव्या गवतावरुन ते तुरुतुरु धावायचे आणि क्षणात भरारी मारुन परत जमिनीवर उतरायचे. पंखांच्या विशिष्ट हालचाली करुन मधेमध्ये जमिनीवर आपले पोटही घासायचे. या पक्ष्यांचा सध्या विणीचा हंगाम असल्याने त्यांनी संख्या भरपूर प्रमाणात होती.

माय-बापाच्या संरक्षणात त्यांची इवली-इवली अंगठयाएवढी पिल्लं मुक्त संचार करत होती.

एवढयात चिमणीपेक्षा मोठया आकाराच्या एका जमीनीवरील पक्ष्याची हालचाल नजरेत पडली. हा होता छोट आर्ली (small pratincole). चिमणीपेक्षा काहीसा मोठा नदीकाठी राहाणारा हा पक्षी आहे. पंकोळीसारखे टोकदार पंख, बाणाच्या आकाराची शेपटी, शरीरचा खालील भाग तांबूस छटा असलेला धुरकट-तपकिरी पांढऱ्या रंगाचा डोळे आणि चोचीला सांधणारी काळसर पट्टी, उडतांना खालचा भाग पांढुरका त्यावर काळया रेक्षा दिसतात. आखूड पांढऱ्या शेपटीवर काळा ठिपका असून ते समूहाने राहातात.

निळ्या शेपटीचा राघू

उडणारे किडे-कीटकं हे त्यांचं खाद्य असून ते निवासी, भटके आणि स्थानिक स्थलांतर करणारे आहेत. आवाज टक् टक् टक् किंवा टिरीरींट, टिरीरींट असा काढतात. फेब्रुवारी ते एप्रिल महिन्यात या पक्ष्यांची वीण होते. यांची पिल्लं थोडीफार मोठी होत होती.

चमूमधील पक्षी अभ्यासक मंडळी आपआपले दुर्बिन वकॅमेरे घेवून चोहीकडे पसार झाली होती. काही तर हिरव्या काठाकाठाने दूरदूरपर्यंत नवनवीन पक्ष्याच्या पाठलागात आणि शोधात दिसेनासी झाली होती. जवळपास चार तासाची भटकंती झाली होती. काही मित्रांनी कंठेरी चिलखा आणि त्यांच्या गोंडस पिल्लांची अतिशय उत्तम अशी छायाचित्र मिळविली. काहींनी आर्ली पक्ष्याच्या विविध हालचाली टिपल्या. तर एका मित्राने अथक प्रयत्न करुन मालदिवी पाणभिंगरी(Oriental Pratincole) या दुर्मिळ पक्ष्याची सुरेख अशी छायाचित्र मिळविली होती. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. सूर्य डोक्यावर येत असल्याने काहीसा उकाडाही जाणवत होता. थकवाही जाणवत होता. काही क्षण आरामात घालवून चमू दोन किलोमीटर अंतरावरील धरणाच्या दरवाज्याकडील वर्धा नदीकाठाने जाण्यास निघालो.

धरणाच्या दरवाज्यापुढे असलेल्या पुलाच्या अवतीभोवती भिंगरी (Swipt) पक्ष्यांच्या विविध कवायती सुरु होत्या. पलीकडे उजवीकडे वर्धा नदीच्या काठाकाठाने मातीच्या उभ्या भिंतीवर असलेल्या मुठभर

आकाराच्या असंख्य भोकाजवळ भरपूर अशा स्थलांतरीत निळया शेपटीच्या पाणपोपटांच्या हालचाली नजरेत पडल्या. जवळ जावून पोहतो ती भोकं म्हणजे त्यांची घरटी असून या पक्ष्यांची ती संपूर्ण वसाहतच येथे अस्तित्वात आली होती. हा पक्षी आकाराने वेडयाराघूपेक्षा मोठा असून त्याचा पार्श्वभाग आणि शेपटी निळी होती. काही पाणपोपट टिय्यू,टिर्रे टिर्रsss टिय्यु आवाज करत त्या घरटयात अर्धवट शरीर झोकून देत होती. त्यामुळे संपूर्ण् घरटी हिरवी-तांबडी झाली होती. नर-मादी दोघेही दिसायला सारखेच असतात. हे पक्षी भारतात स्थानिक स्थलांतरीत असून हिमालयात एक हजार मिटर उंचीवरही ते राहातात. पाकीस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, आसाम, कर्नाटक, नेपाळ, बांगला देश, श्रीलंगा, अंदमान निकोबार बेटे या भागात ते हिवाळी पाहूणे आहेत. मार्च ते जून हा त्यांचा विणीचा काळ असून नदीकाठ, झिलाणी, राने इ. ठिकाणी ते आढळून येतात.

आपल्या भारत देशाला मिळालेली निसर्गाची अनमोल देण म्हणजे ऋतुचक्र. प्रत्येक ऋतुचक्रात येथील संपूर्ण जीवसृष्टी आपलं जीवनचक्र चालवित असते. त्यात सामील होत असते. त्याप्रमाणे असंख्य स्थलांतरीत पक्षीगणसुध्दा यात सहभागी होत असतात. स्वत:च्या जीवनाला आवश्यक असे पोषक वातावरण ज्या भागात असते तेथे हे पाखरं स्थलांतर करतात व आपलं अस्तित्व टिकवून ठेवतात . आपली कुळं वाढवत असतात. निळया शेपटीचे पाणपोपट हेसुध्दा विदर्भभूमिला मिळालेलं वैशाखाचं असच एक सुंदर देणं आहे.

10

नवथळचा शिकारी :

उंदीरमार बाज

सृष्टीवर शिशिरछाया पसरली होती. उन्हेही तापायला सुरुवात झाली होती. वर्षा ऋतुत तुडूंब भरलेली लहान-सहान तळी आटणे सुरु झाले होते. त्यामुळे स्थलांतरीत पक्ष्यांची तळ्यावरील उपस्थिती कमी कमी होत चालली होती. तर शेतातील हरभरा पिकाची सोंगणी होवून शेतात त्यांच्या गंज्या पडू लागल्या होत्या. तूर पिकही त्याच अवस्थेत दिसत होते. अशा वातावरणात एका शिशिर पहाटे अमरावती-दर्यापूर मार्गाने नवथळ या गावातील तळ्याकडे माझी पावलं पडली.

शेतात दुचाकी ठेवली आणि तलावावर पोहोचलो. तलाव पूर्णपणे कोरडा पडला होता. पाणपक्षी नावालाही नव्हते. केवळ टिटवी पक्ष्यांचा टिव टिव टिटिव टिव आवाज त्या परिसरात ऐकू येत होता. टिटवीचा हा विणीचा हंगाम असतो. आजूबाजूच्या लहान झुडूपांवर मूनियाचे थवे तेवढे नजरेत पडत होते. एका महिन्यातील या भागाचे हे माझे पाचवे भ्रमण. परदेशी स्थलांतरीत क्रौंच पक्ष्यांच्या शोधात हा सारा उपद्व्याप होता. पहिल्या भ्रमणात शेकडो क्रौंच पक्ष्यांचा थवा मला याच तळ्यावर आढळून आला होता. त्यानंतर सतत चार भ्रमणात क्रौंच दिसले नाही.

तळ्याला एक चक्कर मारली आणि बाहेर शेतात ठेवलेल्या दुचाकीपर्यंत येवून पोहोचलो. गाडी सुरु करावी एवढ्यात सोबतचे माझे मित्र पक्षी अभ्यासक खांडेकर सरांचा आवाज आला. सर, त्या झाडाच्या टोकावर बघा!

पाहातो तो, एका मोठ्या बाभुळीच्या झाडाच्या टोकावर एक मोठा अनोळखी शिकारी पक्षी बसला होता. मीही माझा पवित्रा बदलला. परत कॅमेरा सज्ज केला आणि तूर-हरभराच्या शेतातून लपत-छपत] सावधपणे त्या बाभुळीकडे हळूहळू निघालो.

पहाटेचं कोवळ उन तेथील निसर्गसृष्टीवर पसरलं होतं. पूर्णत्वास आलेल्या पिवळसर पिकांचे शेतही सोनेरी छटेत न्हावून निघालं होतं. काही अंतरावर जावून बाभुळीच्या डोक्यावर बसलेल्या त्या अनोळखी शिकारी पक्ष्यावर कॅमेराचा फोकस लावला. आणि एक छायाचित्र काढले. हळूहळू चोरपावलांनी अंतर कमी कसे होईल यादृष्टीने धडपड करु लागलो. एवढ्यात त्याने आपले भले मोठे पंख उघडले आणि पलीकडे जवळपास दोन फर्लांगवरील दुसऱ्या बाभूळीच्या झाडाकडे भरारी घेवून तेथे जावून बसला.

माझा पाठलाग सुरु झाला. त्या झाडापर्यंत पोहचल्या बरोबर त्याने परत एक उड्डाण भरली आणि परत अगोदरच्या झाडावर जावून बसला. मी परत तिकडे माघारी फिरलो आणि शक्य होईल तेवढ्या कमी अंतरावरुन छायाचित्र काढू लागलो. सकाळचं कोवळं-तांबडं उन त्या झाडाच्या टोकावर बसलेल्या शिकारी पक्ष्यावरही पडल्याने एक सोनेरी झळाळी त्याच्या अंगावर दिसून येत होती. जमिनीवरील सभोवतालचे भक्ष्य शोधासाठी त्याची मान व तिक्ष्ण डोळ्यांची हालचाल सुरु होती. त्यामुळे सुरक्षित अंतर ठेवून मला छायाचित्र काढता आली.

मात्र एवढ्यात परत त्याने आपला पवित्रा बदलाला आणखी भरारी घेवून दूरवर शेतात जमिनीवर खाली उतरला. काही तरी भक्ष्य त्याच्या नजरेत पडले होते. माझे व त्याचे अंतर भरपूर असल्याने मी परत श्वास रोखत रोखत त्या दिशेने धावपळ करत निघालो.

शेतातील पिकांमुळे जमिनीवरील त्याची हालचाल पूणपणे दिसत नव्हती. तीन-चार मिनिटानंतर परत त्या शिकारी पक्ष्याने तेथून आणखी एक उड्डाण भरली आणि परत सुरुवातीच्या बाळभुळीच्या झाडाच्या टोकावर जावून बसला. मला त्याचे भक्ष्य जरी दिसले नाही तरी झाडावर बसेपर्यंत त्याची भरारी व्हिडीओ चित्रणात बंद करता आली. परत काही वेळाने त्याने एक ऊंच उड्डाण भरली आणि मीही माघारी फिरलो.

सतत एक-दिड तासाच्या पाठलाग करण्याच्या हालचालीमुळे थोडा थकवा आला होता. घसाही कोरडा पडला होता. शांतपणे एका झाडाच्या सावलीत बसलो. पाणी पिवून शांत झालो. आणि कॅमेरात छायाचित्राचे निरीक्षण करु लागलो. तो होता दुर्मिळ असा शिकारी पक्षी उंदीरमार बाज (Long-Legged Buzzard). उंदीरमार बाज हा पक्षी आकाराने ब्राम्हणी घारीएवढा असतो. शरीर तपकिरी रंगाच्या विविध छटांचे असून डोके पांढऱ्या-तपकिरी रंगाचे असते. मान व छातीही त्याच रंगाची असते. शेपटी फिकट पिवळसर तपकिरी असून त्यावर अस्पष्ट फुल्या फुल्यांची नक्षी व टोकाजवळ स्पष्ट दिसणारा आडवा पट्टा असतो. पाय पिसे नसलेले असतात.

भारतीय उपखंडात हिमालयीन जंगलयुक्त प्रदेशात तर हिवाळ्यात मैदानी प्रदेशात मोठ्या प्रमाणात आढळतात. कर्नाटक व तामिलनाडूच्या दक्षिणेपर्यंतच्या प्रदेशात यांचा आढळ असून श्रीलंकेतही हा पक्षी आढळून येतो. कित्येकदा वणवा पेटलेल्या जंगल भागात आगीतून जीव वाचविण्यासाठी धडपड करणाऱ्या प्राण्यांची तो शिकार करतो. मृत प्राण्यांचे मांस, लहान-सहान सस्तन प्राणी, जखमी पक्षी, सरपटणारे जीव इ.या पक्ष्याचे अन्न आहे. मार्च ते मे हा या शिकारी उंदीरमार बाज पक्ष्याचा विणीचा हंगाम असतो.

माझ्या मते या भागात गहू-हरभराची भरपूर प्रमाणात पिक घेतले जाते. अशा प्रकारच्या शेतात उंदीर-घुसीचे प्रमाणही फार मोठ्या प्रमाणावर असते. त्यांची शिकार करण्याकरिता स्वाभाविकच सरपटणारे जीवही येथे भरपूर येत असावे. एवढे सारे भरपूर खाद्य येथे असल्याने हा शिकारी उंदीरमार बाज येथे या काळात दिसत असावा. कदाचित उंदीर हे त्याचे आवडते खाद्य असावे म्हणून उंदीराची शिकार तो जास्त प्रमाणात करतो. आणि म्हणून यावरुन त्याचे नावही उंदीरमार बाज असे पडले असावे,असे वाटते.

. . . . .

11 कलकल कलहंसे . . .

कलहंस

कलहंसाचा थवा

पाखर पहाटे गोंदिया वरुन जवळपास वीस किलोमीटरवरच्या झिलमीली जलाशयावर पावलं पडली. डावीकडील शेतात साधारणता एक हजार फुटावर 70-80 कलहंस [Gray lag Goose] पक्ष्यांचा थवा शांतपणे पहाटेची उब खात बसला होता. यावेळी ते आवजाने एकमेकांमध्ये संवाद साधत होते. मी मात्र त्यांना कॅमेरात टिपण्यासाठी धडपडत होतो. कारण एवढ्या मोठया संख्येने कलहंस प्रथमच पाहण्यात आले होते.

एवढ्यात डावीकडून दोन गावठी कुत्रे कलहंसाच्या थव्याकडे धावत येतांना दिसले. त्यांचा इरादा स्पष्ट होता. धोका लक्षात येताच बसलेल्या थव्यामध्ये अचानक हालचाली वाढल्या. कलहंसाच्या कुर्र् क्कॉक आवाजाचं लोण अख्या परिसरात परसलं. कुत्रे जवळपास पंचवीस-तीस फुटावर येत नाही तोच अख्खा थवा पंख फडफडवत उडू लागला. यावेळी एखादं वादळ उठावं तसं शेकडो कलहंसाच्या मोठमोठया पंखाच्या आवाजाचं वादळ उठलं आणि पाहाता पाहाता ते दिगंतरात पसरलं. नशिबानं कलहंसाच्या थव्यातील एकही पक्षी कुत्र्यांच्या तावडीत सापडला नाही. अशावेळी लहान पिल्लं किंवा एखादा जखमी पक्षी अशा शिका-यांच्या तावडीत सापडायची भीती असते. कलहंसाचा थवा नभात घिरट्या घेता घेता दुसरीकडे निघून गेला

आणि जीवन-मृत्यूचं एक संकट टळलं. सारं काही शांत शांत झालं. सारसाच्या शोधात एवढया मोठ्या प्रमाणात चक्क कलहंस पक्ष्यांचा एवढा मोठा थवा प्रथमच पाहायला मिळाला, त्यामुळे मनात चैतन्य संचारलं होतं.

कलहंस पक्षी वरुन रंगाने तांबडा त्यावर पांढऱ्या रंगाचे जाळीसारखे आडवे धागे दिसत होते. कधी तो आपल्या पंखांमध्ये चोच खूपसून बसायचा. कधी पंख साफ करायचा तर कधी शांतपणे बसलेला होता. 'कलहंस' (Greylag Goose) हा राजहंसापेक्षा थोडा मोठा असतो. त्याची चोच व पाय तांबडे, डोके संपूर्ण काळे, पिसारा हिरवट तांबडा असतो. कलहंस पक्ष्याची लांबी २९ ते ३६ इंचापर्यंत वजनाने तीन ते सव्वातीन किलोपर्यंत असतात. पृथ्वीच्या उत्तर भागात युरोपध्ये बर्फाळ प्रदेशात जलाशयाचया काठावर वसंत ऋतूत त्यांची वीण होते. तर हिवाळयामध्ये हे कलहंस दक्षिणेकडे आशिया खंडात तीन ते चार महिन्याकरिता स्थलांतर करतात. रघुनाथ पंडीत यांच्या 'नलदमयंती स्वयंवर' या आख्यानात नळराजा आणि हंस भाग २ मध्ये कलहंसाचे अत्यंत सुरेख वर्णन केले आहे. ते पुढील प्रमाणे-

कलकल कलहंसे फार केला सुटाया
फडफड निजपक्षी दाविलें की उडाया

नृपतिस मणि-बंधी टोंचिंता होय चंचू

धरी सृदृढ ज्या तो काय सोडील पंचू ||

तदितर खग भेणें वेगळाले पळाले

उपवन जल केली जे कराया मिळाले

स्वजन गवसला जो त्याजपाशी नसे तो

कठिण समय येता कोण कामास येतो ||

मला कलहंसाचे हे वर्णन वडीलांच्या मुखातून बालपणीच ऐकायला मिळाले. तेव्हापासून मी कलहंसाच्या शोधात होतो. आज जवळपास पन्नास वर्षानंतर माझे हे स्वप्न पूर्ण झाले.

स्वीडीश निसर्गतज्ञ कार लिनेअस (Car Linnqeus) याने १७५८ मध्ये पहिल्यांदा कलहंसाचा शोध लावला. परंतु दोन वर्षानंतरच फ्रेंच झुआलॉजिस्ट मॅथूरीन जॅक्स ब्रिसन (Mathurin Jacques Brisson) याने कलहंसाच्या दोन प्रजाती असल्याचे सिध्द केले. पश्चिम कलहंस ज्याची वीण उत्तर आणि मध्य युरोपात बर्फाळ होते. तर दुसरा पूर्व कलहंस याची वीण रोमानिया, तुर्की आणि रशिया ते उत्तर चिनमध्ये होते.

पृथ्वीतलावर सजीवसृष्टीची प्रथम उत्पत्ती पाण्यातच झाली. त्यानंतर ते भूभागावर आले. परंतु मानवासहीत संपूर्ण सजीवांना जीवंत राहण्यासाठी सर्वात आवश्यक गरज म्हणजे पाणी. धरणं, जलाशय आहेत म्हूणन सजीव आहेत. **जेथे पाणी तेथे जैववाणी**. त्यामुळे जेवढी जास्त पाणीसाठे निर्माण होतील, तेवढी तेथे सजीवसृष्टी वाढीस लागेल. पक्षी हे पर्यावरण संतुलनात अत्यंत मोलाचा हातभार लावत असतात. म्हणून तर दरवर्षी लाखोच्या संख्येत परदेशी स्थलांतरीत पक्षी पृथ्वीच्या उत्तरेकडून आशिया खंडाकडे विविध जलाशयांवर येतात. आपला भारत देश हा त्यातील एक सर्वात महत्वाची भूमि.

सूर्य पाठमोरा होऊ लागला होता. उन्हे उतरु लागली होती. चेहरे ओरबाडल्यागत झाले होते. थकवाही जाणवू लागला होता. झिलमीली जलाशयावरील देखण्या कलहंसाच्या दर्शनाने धन्य वाटत होते. पावलं माघारी फिरता फिरता शब्द गुणगुणत होतो-

स्वजन गवसला जो त्याजपाशी नसे तो

कठिण समय येता कोण कामास येतो . . . . . .

. .

12 ‘ डूडा ’

शिशिराची उन्हे तापायला लागली होती. सूर्य डोक्यावर येता येता चौराकुंडवरुन मालूरगडे निघालो. सभोवतालची वृक्षराजी बोडखी पडली होती. काळसर-राखोडी सागपर्ण आपले कार्य संपल्याने हवेत गिरक्या घेत घेत अरण्यभूमिवर पडू लागली होती. अरण्य भूमिने केवळ वाळलेल्या पानांचे वस्त्र पांघरले होते. सर्वत्र शुष्कपणा जाणवत होता. सागपानावरुन चालता चालता कचकच् आवाज येत होता. वनरक्षक फालतू म्हणजे डूडाचा जणू नातेवाईकच. एखाद्या पक्षीसंशोधकाला लाजवेल असा रानपिंगळ्याचा संपूर्ण अभ्यास या आदिवासी तरुणाला झालेला आहे. डूडाचा जणू मित्र असलेल्या फालतूची नजर आणि कान सभोवतालच्या जंगल परिसरात रानपिंगळ्याचा शोध घेत होते. त्यामुळे त्याच्या मागोमाग काटाकुटक्यातून चालत माझी नजरही झाडाझाडावरुन फिरत होती. तो चाहूल घेत होता ती डूडाच्या अस्तित्वाची.

एका दुर्मिळ पक्ष्याच्या अस्तित्वाने हा जंगल परिसर ओळखल्या जातो. हा रानपक्षी म्हणजे **'रानपिंगळा'** **Forest owlet**. यालाच मेळघाटातील दऱ्याखोऱ्यात राहाणारे आदिवासी कोरकू 'डूडा' असं म्हणतात.

अरण्यातील रानवाटा गुडघाभर अुंचीच्या गवती तृणमेळयाने व्यापल्या होत्या. सूर्य डोक्यावर ठेवून एकसारखी भटकंती सुरु होती. रखरखत्या उन्हामुळे घामाचे लोट मानेवरुन उतरत होते. हलकासा थकवाही जाणवत होता. फालतू मात्र अधिक उत्साहात होता.

दोन हाताच्या ओंजळीची मिळवणी करुन तो तोंडाजवळ धरुन चालत होता. ज्यावेळी त्यात हवा फुंकून बोटांच्या हालचाली करायचा त्यावेळी श्रीक् श्रीक् असा एक विशिष्ट आवाज निघायचा. तरीही डूडा त्याला प्रतिसाद देत नव्हता. अचानक काही वेळाने वृक्षागारातून प्रतिसाद मिळाला. तो होता रानपिंगळयाचा म्हणजेच डूडाचा आवाज. फालतू आता त्या आवाजाच्या दिशेने शोध घेत घेत चालत होता. अखेर एका सागवृक्षाच्या फांदीवर त्याने डूडाला शोधून काढले आणि खूणेने आम्हालाही बोलाविले. मला आनंद झाला. आमच्या चमूत चैतन्य पसरलं.

झाडाच्या ढोलीत डूडाचे घरटे

सागवनातील हल्दू प्रजातीच्या कलम वृक्षाच्या आडव्या फांदीवर हिरव्या पानांच्या सावलीत हा दुर्मिळ रानपिंगळा पक्षी शांतपणे बसला होता. मी एका झुडूपात आडोशाची जागा पकडून त्याच्या विविध भावमुद्रांचे छायाचित्र टिपणे सुरु केले.

सागाच्या लहान पानाएवढा त्याचा आकार डोक्यावर मुलायम धुरकट रंगाची लव, भुवया व डोळे खोलगट, डोके चपटे, पोट आणि छातीवर पांढरे ठिपके, डोकं लांब वर्तूळाकार असून पाठ तांबूस रंगाची होती. तसेच पायावर पिसं, शेपटावर हलकीसी पांढरी किनार आणि पंखाच्या काठावर पांढरे ठिपके अशी त्याची एकूण रंगसंगती होती. एवढयात या नर डूडा पक्ष्याने **श्रीक् श्रीक्** असा आवाज काढला व काही क्षणातून तेथून भरारी मारुन पलिकडच्या भागात पसार झाला. त्याचे मादीला साद घालणे सुरु होते. कारण पलीकडून **कुवा, कुवा, कुवा** असा मादीने प्रतिसाद दिला होता.

नर-मादी ज्या झाडावर एकत्र बसले होते तेथे त्यांना कसलीही चाहूल लागू न देता मी पोहोचलो. यावेळी बुलबुल, स्वर्गीय नर्तक, कोतवाल, मैना हे पक्षी या रानपिंगळयाच्या जोडीवर झडपा घालून हुसकून द्यायचा प्रयत्न करीत होते. परंतु त्याकडे त्यांनी साफ दुर्लक्ष केले. अधिवासाच्या हक्कासाठी हा इतर पक्ष्यांचा आटापिटा होता.

तीस-चाळीस फुट उंचीवर तो सावलीत बसला असल्याने छायाचित्र घेण्यास बरीच कसरत करावी लागत होती. तरीही मिळेल तसे छायाचित्र घेत होतो. आम्ही पाचही पक्षिवेडे प्रकाशचित्र आणि चलतचित्रण करण्यास तुटून पडलो होतो. जवळपास अर्धा तास झाला. रानपिंगळा काही जागचा हलत नव्हता. मला प्रश्न पडला इतका वेळ हा नर एकाच ठिकाणी का बसली असावा ? वैशाखातील भर दूपारी रखरखत्या उन्हात त्या सागगारात एकाही झाडावर हिरवे पानं नव्हती. केवळ तेथील सावलीत विश्रांती घेण्यासाठी त्याने ही जागा शोधली होती. जवळपास दिड तास निरीक्षण व छायाचित्र घेता घेता थकून गेलो. परंतु रानपिंगळा काही जागेवरुन हलत नव्हता. शेवटी आम्हीच तेथून परत निघण्याचा निर्णय घेतला. मालूर गावाकडे निघालो.

1886 पासून रानपिंगळा हा पक्षी जगातून नामशेष झाला होता. त्यानंतर तब्बल 1995 मध्ये म्हणजे तब्बल 114 वर्षानंतर अमेरिकेच्या पक्षी अभ्यासक पामेला रासमुसेन यांच्या चमूने हा पक्षी नंदूरबार परिसरातील अरण्यक्षेत्रात शोधला. त्यानंतर हा पक्षी 2001 मध्ये मेळघाटातही पक्षी अभ्यासकांनी शोधून काढला.

जंगलातील तृणमेळयाच्या परिसरात झाडावरील लहान-सहान ढोलीत हा आपलं निवास निवडतो. रानवाटेवरुन जाणाऱ्या जनावरे, वाहन यांच्या हालचालीने उडणाऱ्या किटकांकडे तो आकृष्ट होतो.

'डूडा' हा पक्षी घाबरट नसून परिसरात येणाऱ्या पक्षी निरीक्षकांचे तो स्वत: निरीक्षण करत असल्यासारखा दिसतो. सूर्योदयानंतर त्याच्या हालचाली वाढतात. सांजवेळीही तो कार्यरत असतो. मात्र जास्त उन्हे या पक्ष्याला सहन होत नाही. तसेच स्वत:च्या अधिवास क्षेत्रात त्याला दुसरा रानपिंगळा पक्षी आलेला सहन होत नाही. त्याचा आकार आणि रचनेवरुन बुलबुल, नर्तक, कोतवाल त्याला शिकारी पक्षी समजून पळवून लावण्याचा प्रयत्न करतात. मात्र याकडे तो दुर्लक्ष करत असतो. कुठल्याही पक्ष्याच्या मागे तो लागत नाही. नर-मादी आवाजाने एकमेकांना साद-प्रतिसाद देवून एकत्र आल्यावर सोबतीने उडून जातात. इतर पिंगळा पक्ष्यांप्रमाणे डूडा पक्षी सुध्दा 180 च्या कोनात मान फिरवतो. मात्र इतर घुबडांच्या मानाने याचे डोळे खोलगट वाटतात. जाड भुवया समोर

आलेल्या असल्यामुळे त्याच्या भुवयांची सावली खालच्या डोळयावर पडते. त्यामुळेच हा पक्षी रात्री कार्यरत राहात नसावा. तो दिवसाच किडे-कीटकं, पाली, सरडे, बेडकं यांची शिकार करतो.

मालूरकडे जाता जाता डोंगराच्या पायथ्यावर वनजमीनीवर पट्टयाव्दारे मिळालेल्या जागेत आदिवासी बांधव आणि त्यांना मिळालेली घरे आणि शेती नजरेत पडली. रानवाटेच्या दोन्ही बाजूने आयुर्वेदिक औषधी गुण असलेला तरोटा मध्यप्रदेशात नेत असल्याने त्याचे प्रमाण अत्यंत कमी झाले आहे. एकीकडे देशात सर्वत्र जंगलाचा –हास होत असतांना हा प्रकार वन्यजीवांच्या अधिवासास बाधा आणणारा नाही काय ? पुढे काही वेळाने झांजरी-मांजरी या पर्वतावरील वनचौकीवर पोहोचलो. पूर्वीचे येथील सारे निसर्ग सौंदर्य ओरबाडल्यागत दिसत होते. यापूर्वी जवळपास पाच-सात वर्षापूर्वी आम्ही येथे मुक्काम केला होता. खाली "खापरा" नदी आणि तिचं खोरं नजरेत पडते. नदीमध्ये दोन डोह आहेत. त्यांची नावं झांजरी-मांजरी. म्हणूनच या जंगल परिसराला झांजरी-मांजरी असं नाव पडलं. खापराच्या खोऱ्यातील वृक्षराजी आणि त्यातील समृध्द निसर्ग आता लोप पावत चालल्यासारखी झाली आहे. पूर्वी हा घुबडांचा टापू होता. त्यामुळे असंख्य घुत्कार ऐकू यायचे. हू हू आवाजाने परिसरातील वातावरण भारुन जायचे. वाघ, अस्वल, हरणं इ.मुळे हे अरण्य जीवंत वाटत होतं. असंख्य पक्षी

दिसायचे. हळूहळू शिकाऱ्यांचे हात येथेही पोहचले त्यामुळे वृक्षतोड आणि शिकार झाल्याने हा संपन्न परिसर आज केवळ वन विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीपुरता मर्यादित राहिला आहे.

दऱ्याखोऱ्याच्या वनवैभवी मेळघाटात पाणी भरपूर आहे. पण त्याचे पाहिजे तसे नियोजन नाही. त्यामुळे काही ठिकाणं ओस पडली आहेत. त्यामुळे अभ्यासक, पर्यटक या भागात येत नसावेत. आणि यामुळेच तेथे आयतेच केवळ शिकाऱ्यांचेच साम्राज्य पसरले असावे. मी गेल्या जवळपास तीस- वर्षापासून मेळघाटात भ्रमण करतो. परंतु अत्यंत तळमळीने आणि जिव्हाळयाने काम करणारे अधिकारी, कर्मचारी फार कमी आहेत. असाच एक जंगलावर प्रेम असणारा कर्मचारी म्हणाला – साब, अब मेळघाट धिरे धिरे खलाश हो रहा है. किसीको चिंता नही है. जिनको चिंता है उनके पिछे वरिष्ठ पदपर के लोग तकलीपे जादा पैदा कर देते है. इसलिये जो थोडे बहोत ऐसे अधिकारी, कर्मचारी है उन्होनें अब अच्छे काम करना छोड दिया है. याचा परिणाम भविष्यात या समृध्द जंगलाचे काय होणार ? हे सांगायची गरज नाही.

काहीही असो! जंगल म्हणजे काही एकटा 'वाघ' नाही. जंगल म्हणजे असंख्य सजीवांचं अस्तित्व असलेला एक जीवंत जीता जागता देह आहे. 'डूडा' हा सुध्दा या अरण्यातील एक दुर्मिळ पक्षी आहे.

एकेकाळी वाघापेक्षाही दुर्मिळ झालेला हा ‘रानपिंगळा’ आज मेळघाटच्या काही अरण्यक्षेत्रात चांगल्या प्रमाणात दिसत आहे. आज त्याच्या अधिवास क्षेत्रात अभ्यासाकरिता देश विदेशातील असंख्य पक्षी निरीक्षक मेळघाटमध्ये निरीक्षण करतांना दिसत आहेत, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. त्यामुळेच मेळघाटचं जंगलं चहू बाजूने निसर्ग अभ्यासकांना सतत खुणावत असते. याच अरण्य ओढीने नकळतच माझी पावलंही या मेळघाट नावाच्या माहेराकडे वरचेवर वळत असतात.

13 सारंगागार

विदर्भाची शैक्षणिक, सांस्कृतिक पंढरी म्हणून अमरावती हे शहर ओळखलं जाते. अलीकडे या शहरात बऱ्यापैकी रस्ते आणि पुलांच्या विकास कामाला गती आली आहे. मात्र माणसांनी गजबजलेल्या या शहरात पोपटांचं पण एक छोटसं गांव आहे. हे गांव जमिनीवर नसून ते आहे पिंपळाच्या एका मोठ्या महावृक्षावर. होय हे खरं आहे. एक झाड म्हणजे पक्ष्यांचं गावच ना! कारण त्या झाडांवर राहतात असंख्य पोपट. गेल्या कित्येक वर्षापासून अनेक ऋतुचक्रातून त्यांचंही जीवनचक्र सुरु आहे.

पोपटांचं हे अनोखं गांव आहे चक्क पोलीस स्टेशनच्या सुरक्षित आवारात. अनेक विकास कामांमुळे रस्त्यांच्या आजूबाजूच्या कित्येक झाडांची कत्तल होते. पण हे पाखरांचं गांव अमरावती राजापेठ पोलीस स्टेशनच्या परिसरात गेल्या साठ-सत्तर वर्षापासून सुरक्षित आहे. या परिसरात पिंपळ, कडुनिंबाचे चार-पाच मोठे झाडं आहेत. या झाडांवर हे पोपट राहतात. हे केवळ एक पिंपळाचं झाड नसून ते आहे हजारो पोपटांचं एक गांव

एक दिवस भल्या पहाटे मी या परिसरात गेलो. नुकतत्याच संपलेल्या शिशिरामुळे बोडख्या झालेल्या झाडांवर वसंत ऋतुची हिरवी कोवळी छाया पसरली होती. येथील झाडं हळूवारपणे हजारो पोपटांच्या किलबिलाटानं जागं होवू लागले होते. येणाऱ्या जाणाऱ्या कित्येक नागारिकांचं लक्ष वेधून घेत होतं. पहाटे अन्नाच्या शोधात निघण्याची झाडांवरील पोपटांची लगबग सुरु होती. काही पोपट आपआपले पंख साफ करत होते. काही एकमेकांना आवाज देवून जागं करीत होते. तर काही पोपट ऐकमेकांच्या झाडांवर जावून निघण्याच्या सूचना देत होते. आणि मग काही क्षणातच हजारो पोपट आपआपले पंख फडफडवून, आवाज देत थवेच्या थवे दिगंतरातून दूर गावी अन्नाच्या शोधात निघून गेले. यावेळी एखादं वादळ उठावं तसं हे दृश्य होतं. या विलोभनीय दृश्याने मी अचंबित झालो होतो. पूर्व दिशा उजळायच्या आतच पोपटांचं गांव अबोल होवून गेलं होतं. महत्वाचे

म्हणजे पोपटांच्या या गावातील झाडांवर केवळ पोपटच राहातात. तेही हजारोंच्या संख्येत. यांनाच रावे असंही म्हणतात.

त्यानंतर परत मी सांजवेळी येथे पोहोचलो. सायंकाळी साडे सहाच्या सुमारास हळूहळू पोपटांचा एक एक थवा झाडावर परतणे सुरु झाले होते. फांदीफांदीवर, पानापानात जागा शोधण्याची लगबगही सुरु झाली होती. किलबिलाटही वाढू लागला होता. थव्यामागून थवा असे हजारो पोपटांचे थवे झाडांवर जागा शोधू लागले होते. आता तर परिसरात केवळ आणि केवळ पोपटांचाच आवाज येत होता. एवढा की बाजूच्या वाहतूकीच्या रस्त्यावरील वाहनांच्या वर्दळीचा आवाज सुध्दा पोपटांच्या किलबिलाटासमोर झाकाळून गेला होता. दिवसभर शांत असलेली झाडं पानापानातून पोपटांची भाषा बोलू लागले होते.

बोडखी झाडं पोपटांच्या उपस्थितीमुळे लदबदल्या सारखी दिसत होती. झाड पानापानातून पोपटांची भाषा बोलू लागलं होतं. हळूहळू संध्याछाया पसरु लागली आणि काही वेळानंतर पोपटांचं गांव शांत झालं होतं. रात्रभर हे पोपट निवाऱ्यासाठी येथेच असतात. अशा झाडांना अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांनी 'सारंगागार' किंवा 'पक्ष्यांचा रातनिवारा' असे म्हटले आहे. रात्र संपून जाते आणि पूर्वेचं तांबडं फुटता फुटता या गावाला परत

पोपटांचा कंठ फुटतो. माझ्या मते त्यांच्या आवाजातून जणू काही हे केवळ आमचेच गांव आहे, असं सांगायचं असावं.

येथील सर्वात मोठा पिंपळाचा वृक्ष शंभरी पार केलेला असावा. तर दुसरे पिंपळाचे झाडही शतकाकडे झुकलं असावं. गेल्या कित्येक वर्षापासून आतापर्यंत या झाडावर पोपटांच्या कित्येक पिढ्या निर्माण झाल्या असाव्यात. घडल्या असाव्यात. संपल्या असाव्यात. उत्पत्ती, विनाश आणि विनाशातून परत उत्पत्ती निसर्गाचं हे चक्र सुरुच राहाणार आहे. सोबतच हा वृक्ष वारसा वृक्ष (Herritage Tree) म्हणून जतन होणे गरजेचे वाटते. पर्यावरण तज्ञांतर्फे त्यादृष्टीने या परिसराचा आणि झाडांचा विशेष अभ्यास होणे जरुरीचे वाटते.

जीवन मरणाच्या या चक्रात जोपर्यंत पोपटांचं हे इवलसं गाव सुरक्षित आहे तोपर्यंत ते गजबजलेलंच राहाणार आहे. नागरिकांचं रक्षण करणाऱ्या पोलीसांप्रमाणे अमरावतीकर नागरिकही पोपटांच्या या सारंगगाराचं रक्षण करतील, अशी अपेक्षा करु या. आणि निसर्ग संतुलनात महत्वाची भूमिका पार पाडणाऱ्या पोपट नावाच्या या निसर्गाच्या एका इवल्याशा घटकाला सलाम करु या !

. . . . .

14 सजीवसृष्टी आणि पावसाचे पूर्वसंकेत

वर्षाऋतु हा नवजीवनाचा, नवनिर्मितीचा ऋतू. राखरखत्या ग्रीष्मात तप्त झालेली सजीवसृष्टी ओलीचिंब होण्याची आस लावून असते. वादळवाऱ्याचा जोर वाढतो. नभात कृष्णमेघांची दाटी होवू लागते आणि मृगनक्षत्रात सृष्टीच्या अंगावर उमटलेली गर्भच्छाया दिसून येते. कारण याकाळात चराचरात सगळीकडे नवनिर्मितीचा सोहळा चालू असतो. पक्ष्यांची घरटी पूर्ण झालेली असतात. चिमण्या, वेडे राघू मातीत आपले अंग घुसळतांना जड झाल्यासारखे दिसतात. काही कावळयांची घरटी बांधण्याची लगबग सुरु असते. एकंदर पाखरांची गती मंदावलेली असते. चराचरावर कुटूंब वत्सलतेची छाया पसरलेली असते.

चातक

सजीवसृष्टीत पशुपक्षी, किडे-कीटकं, वृक्षलता यांना त्यांच्या विशिष्ट हालचालीवरुन पावसाचे पूर्वसंकेत मिळतात. त्यामुळे त्यांना पावसाचा पूर्वअंदाज येतो. त्याप्रमाणे ते येणाऱ्या हंगामाची तयारी करतात. हे अत्यंत गूढ रहस्य आहे. हवामानाचा जो अंदाज मानव प्राण्यास पूर्णपणे सांगता येत नाही ते या पशुपक्ष्यांना आधीच कळतात. त्यानुसार त्यांच्यात दैनंदिन बदल होत जातात. हे कालबध्द नैसर्गिक चक्र आहे. कारण हे सजीव अत्यंत संवेदनशील आणि बदलत्या हवामानाशी स्वत:ला जुळवून घेणारी निसर्गाची आश्चर्यकारक निर्मिती आहे. पृथ्वीच्या निर्मितीपासून चालत आलेले हे निसर्गविज्ञान आहे.

वर्षाऋतू आरंभ होण्यापूर्वी सर्वप्रथम पावसाचे पूर्वसंकेत मिळतात ते 'पिऊ-पिऊ' आवाज काढणाऱ्या चातक पक्ष्यास. पाऊस जर लवकर येणार असेल तर त्यांचे आगमन लवकर होते. तर वेळाने पाऊस येणार असेल तर हे पक्षीही वेळाने येतात. त्यासोबत 'पेर्ते व्हा पेर्ते व्हा' गाणारा पावशा पक्षी ओरडू लागला की पूर्वी शेतकरी बांधव शेतीच्या मशागतीच्या कामास सुरुवात करायचे. काही गावात आजही हे संकेत पाळतात. तसेच तित्तिर, लांडोर, मोर, इ. पक्ष्यांच्या हालचालीवरही विशिष्ट परिणाम दिसून येतात. महाभारतात कावळा हा पक्षी पूर्णपक्षी म्हणून उल्लेख आहे. या पक्ष्याने आंबा, करंज, पिंपळ या झाडांवर घरटे केले असेल तर पाऊस चांगला पडतो आणि बाभूळ, काटसावर इ. झाडावर घरटे केले तर पाऊस कमी पडतो. जुन्या काळी कावळीणच्या कमी-जास्त

अंडे घालण्यावरही हा अंदाज बांधला जात असे. चांगला पाऊस येणार असेल तर इतर पक्षीही अंडी जास्त घालतात.

इतर सजीवाप्रमाणे पावसाचा पूर्वअंदाज किडे-कीटकंही देतात. काळया मुंग्या जेव्हा त्यांच्या इवल्याशा तोंडात पांढरी-पांढरी इवलीशी अंडी धरुन सुरक्षित जागी हलवितांना दिसतात तेव्हा लवकरच पाऊस पडतो. जमिनीत राहणारी, झाडं पोखरणारी वाळवीला वर्षभरात कधीही पंख फुटत नाही. परंतु मृगधारा पडण्याच्या काही क्षण अगोदर यांचे हजारोच्या संख्येतील थवेच्या थवे वारुळातून बाहेर पडतात. उडता उडता ते समागम करतात आणि प्रजननातून निघणारी पिढी दुसरे वारुळं तयार करण्याच्या कामीही लागते. जंगलामध्ये हया वाळवी खाण्याकरिता सरपटणाऱ्या जीवांचा आटापिटा दिसून येतो एवढेचनव्हेतर ही वाळवी खण्यास कोल्हे, लांडगे, घारी, कोतवाल इ. पक्षीही गर्दी करतात.

चाळीस-पन्नास वर्षापूर्वी स्वत: अनुभवलेली गोष्ट म्हणजे आमच्या शेणामातीच्या घरात मृगाच्या तोंडावर पिवळा ठिपकेवाला किडा निघायचा. तो निघाला की आई त्यावर हळद-कुंकु लावून पूजा करायची आणि सांगायची- याला कोणी मारु नका, हा मिरुग असून आता लवकरच पाऊस पडणार आहे. आता तर चोहीकडे

सिमेंट काँक्रीटची जंगलं पसरली. त्यामुळे आता कुठला मृगकिडा अन कुठे सोनपाखरु! तसेच काही सुक्ष्म निरीक्षणे हवामानाचा अंदाज वर्तवतांना अत्यंत मोलाची ठरु शकतात.

वृक्षलतांमध्येसुध्दा पावसाचे पूर्वसंकेत दिसून येतात. खैर, शमीच्या झाडांना फुलोरा आल्यास त्यावर्षी कमी पाऊस कमी पडतो. मे-जूनमध्ये बहावाच्या झाडाला सोनपिवळया फुलांचे गुच्छ पकडतात. कधी-कधी ही झाडं नुसत्या फुलांनी डवरुन निघतात. यावरुन त्यावर्षी चांगला पाऊस पडतो. कारण फुलं भरपूर आली तर फळंही भरपूर लागतील. त्यामुळे स्वजातीच्या बिया जास्तीत जास्त तयार होवून त्याचा प्रसार होईल. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे फुलं भरपूर आली तर किडे-कीटकं आणि पक्षी त्यावर जगतात. त्यांचे प्रजनन कार्य मोठया प्रमाणावर होते. त्याचबरोबर किडे-कीटकं हे ज्यांचे अन्न आहे त्यांनाही भरपूर खाद्य मिळून त्यांचीही संख्या वाढण्यास मदत होते. परंतु असा प्रकार दरवर्षी होत नाही.

सातपुडा पर्वताच्या मेळघाटच्या दऱ्याखोऱ्यात राहाणाऱ्या आदिवासी बांधवांचे पावसाचे पूर्वअंदाजही महत्वाचे वाटतात. ज्यावर्षी चिंचेच्या झाडाला पूर्ण पालवी फुटते त्यावर्षी पाऊस लवकर आणि भरपूर पडतो. झाडाला पालवी फुटण्याच्या प्रमाणावर ते येणाऱ्या पावसाचा अंदाज बांधतात. तसेच मे-जूनमध्ये रात्रीच्या वेळी

जर प्रकाश सोडणाऱ्या नर काजव्यांचे थवेच्या थवे जेव्हा वर-वर जातांना दिसतात तेव्हा पाऊस लवकर आणि भरपूर पडतो. हिरव्या बेडकांच्या विशिष्ट आवाजावरुनही या आदिवासींना पावसाचे पूर्वसंकेत मिळत असतात.

प्राण्यांचही तसच आहे. पाऊस आणि भूकंपाचे पूर्वसंकेत यांना मिळतात. अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांनी मेळघाटात असतांना एका गर्भवती वाघिणीचे सतत जवळून निरीक्षण केले. प्रत्येक हालचालीवर नजर ठेवली. तेव्हा वाघांनासुध्दा पावसाच्या अंदाजाचे आणि भविष्यातील वातावरणाचे पूर्वज्ञान असल्याचे त्यांच्या लक्षात आले. ही गर्भवती वाघीण पिल्लं देणार होती. परंतु वाघिणीने 'डायसकोरिया' कंद खावून गर्भपात करवून घेतला. हे कंद खावून आदिवासी स्त्रियादेखील गर्भपात करवून घेतात. पाऊस न आल्याने गवत उगवणार नाही. गवत नाही म्हणजे तृणभक्षी प्राणीदेखील राहणार नाही. परिणामी आपल्या पिल्लांना भक्ष्य मिळणार नाही. त्यांची उपासमार होईल. याचे पूर्वसंकेत मिळाल्यानेच तिने गर्भपात करवून घेतला.

वर्षाऋतूत पावसाने जर सुरुवातीलाच दडी मारली असेल तर खेडयाखेडयात तरुण मुलं धोंडी काढतात. एका आडव्या काठीला आंबा, पिंपळ, जांभुळ इ. झाडाच्या डहाळया बांधतात. त्यावर बेडकं लटकवतात आणि ती काठी उघडया नागडया अंगाने दोन मुलं खांद्यावर घेतात. मुखातून **'धोंडी धोंडी पाणी दे, दाय दाना पिकू दे,**

धोंडयारे माता पाणी येवू दे...' अशी मेघराजास विनवणी करत गावातून फिरतात. महाराष्ट्राच्या प्रामुख्याने व-हाडात ही बाब अजूनही दिसून येते.

पाऊस वेळाने आणि कमी असेल उंदीरांची वीण कमी होते. उंदरावर आधारीत सापाच्या पिल्लांना कमी भक्ष्य मिळते आणि त्यामुळे सापांची संख्या कमी होवून ज्या पक्ष्यांचे अन्न साप आहेत त्यांचीसुध्दा उपासमार होवून त्यांची वंशवेल पाहिजे त्या प्रमाणात वाढत नाही. आणि म्हणून शिकारी पक्षीसुध्दा आपल्या प्रजोत्पादन कार्यात बदल करतात. पाऊस वेळेवर आणि भरपूर असेल तर उंदिरांची वीण वेळेवर होवून पिल्लांचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे उंदीरावर आधारित असलेल्या इतर जीवांची वीणही वेळेवर होते.

पृथ्वीच्या निर्मितीपासून चालत आलेले हे निसर्गविज्ञान आहे. त्याचे ज्ञान मिळवण्यासाठी निसर्गावर प्रेम करणाऱ्यांनी पावसाळयापूर्वी सजीवसृष्टीत होणाऱ्या बदलांचा अभ्यास केला पाहिजे. कारण हवामानाचा अंदाज वर्तवतांना ते अत्यंत मोलाचे ठरु शकते. यावरच मानवासहीत संपूर्ण सजीवसृष्टीचं भवितव्य अवलंबून आहे..



प्र सु हिरुरकर यांचे गाजलेले पुस्तक.

क्लिक करा फ़क्त. आपोआप उघडेल.

दुर्ग दुर्घट भारी

आसेतूहिमाचल

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्या-आमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण…

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला…” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com

9987737237

www.esahity.com